cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com

नवी दिशा... नवे विचार.....

email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२३८ | शुक्रवार दि.२६ डिसेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### काँग्रेसचे यश दखलपात्रच !

काँग्रेस पक्षाचा जनाधार अजूनही कमी झालेला नाही, हे जवळपास प्रत्येक छोट्या मोठ्या निवडणुकीतून अधोरेखित होत आहे. त्याचा काहीसा प्रत्यय चार दिवसांपूर्वीच निकाल लागलेल्या नगर परिषद व नगर पंचायतींच्या निवडणुकीतून आला. त्यातूनच नेतृत्वाने बहुधा बोध घेतला असावा.

# वन जमिनीवर शेती करता येणार नाही; सर्वोच्च न्यायालयाचा निकाल

नवी दिल्ली । वृतसंस्था

**वन जमीन शेतीसाठी वापरण्यास कायद्याने प्रतिबंध घालण्यात आल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे वन जमीन वापराबद्दल कायद्याचे उल्लंघन करू नये, असा संदेश सर्वोच्च न्यायालयाने निकालातून दिला आहे.**

कर्नाटकमधील गांधी जीवन सामुहिक शेती सहकारी संस्थेला कर्नाटक सरकारने १३४ एकर राखीव जंगलाची जमीन शेतीसाठी भाडेपट्ट्याने दिली होती. हा भाडेपट्टा बेकायदेशीर असल्याचा मुद्दा उपस्थित करत त्याची मुदतवाढ मागण्यात आली. परंतु याबाबतची याचिका फेटाळत



वनजमिनींवर कोणाचीही खाजगी मालकी सांगता येणार नसल्याचे न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि संदीप मेहता यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. या प्रकरणाचा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, यापूर्वीही सर्वोच्च न्यायालयाने अनेक निकालांतून वन आरक्षण रद्द करण्यास प्रतिबंध करणारे बंधनकारक निर्देश दिले आहेत. वनजमिनीवर शेती करण्यासाठी जंगल साफ करणे अपरिहार्य ठरते. परंतु अशी कार्यवाही ही वन (संवर्धन) कायदा, १९८० च्या कलम २ अंतर्गत येते. या कायद्यानुसार केंद्र सरकारची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय कोणतीही वनजमीन बिगर–वनीकरणासाठी वापरता येत नाही. खासगी व्यक्ती वा संस्था वा पक्षाला बेकायदेशीररीत्या देण्यात आलेली राखीव वन परत मिळवावीत. वनावर कोणाचाही खासगी हक्क असू शकत नाही, असे न्यायालयाने या निकालात राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांना निर्देश दिले आहेत. तसेच याचिका फेटाळत भाडेपट्ट्याची मुदतवाढ देण्यास स्पष्ट नकार सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या प्रकरणाचा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, संबंधित वन क्षेत्रात स्थानिक प्रजातींची झाडे लावून पुन्हा वनीकरण करावे. तसेच सहकारी संस्थेने १० वर्षांहून अधिक काळ या वनजमिनीवर शेती करून ताबा ठेवला असला तरी त्यामुळे त्यांना बेकायदेशीररीत्या दिलेल्या ▶▶ पान २ वर

# अजित पवारांशी युती नकोच!

## मुंबईनंतर पुण्यातही काँग्रेसचा स्वबळाचा नारा

पुणे । प्रतिनिधी

**महापालिकांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमवर पुण्यामधील राजकारणात मोठ्या घडामोडी होत आहेत. एकीकडे भाजपने उमेदवारांची चाचपणी सुरू केली आहे. दुसरीकडे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्या आहेत. मात्र यावेळी काँग्रेसने महाआघाडीत बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबईनंतर पुण्यातही काँग्रेसने स्वबळाचा नारा दिला आहे. याबाबतच्या निर्णयाची माहिती पुणे काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी दिली.**



पुण्यामध्ये काँग्रेसने महाविकास आघाडीसोबत एकत्रित निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला होता, मात्र आता काँग्रेसने स्वबळावर निवडणूक लढवणार असल्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे पुण्यातील अटीतटीचा लढती पहावायस मिळणार आहेत. कारण आता महायुतीसह महाविकास आघाडीमधील पक्षही एकमेकांच्या विरोधात रिंगणात उतरणार आहेत. दरम्यान पुण्यात काँग्रेस ठाकरे गटासोबत युती करेल असा अंदाज आहे. पक्षश्रेष्ठींनी त्याबाबत शहरातील कार्यकर्त्यांना सूचना केल्या आहेत. पुण्यात ठाकरे आणि इतर कोणी येत असेल तर त्यांच्याशी चर्चा करा मात्र अजित पवारांशी युती करू नका, असा स्पष्ट आदेश काँग्रेस पक्षाच्या हायकमांडने दिले आहेत. या काँग्रेसच्या निर्णयानंतर अजित पवार आणि शरद पवारांच्या युतीचा मार्ग मोकळा झाला आहे. दरम्यान, तत्कालीन खासदार सुरेश कलमाडी आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्यातील वादामुळे पुण्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप आणि शिवसेना यांची युती झाली. त्याला पुणे पॅटर्न असे नाव देण्यात आले. त्यामुळे भाजप आणि शिवसेनेचे पदाधिकारी पुण्यात सत्तेवर आले. त्यानंतर दोन वर्षात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांची एकत्रित सत्ता महापालिकेत आली. तेव्हा ते २०१७ पर्यंत सत्तेत होते.

# आष्टी तालुक्यात उसाच्या ७ बैलगाड्याला भरधाव वाहनाची धडक : १४ मजूर जखमी

आष्टी । प्रतिनिधी

**तालुक्यातील शेंडगेवाडी (सावरगाव गड) येथील ऊसतोडणी कामगारांच्या बैलगाड्यांना गुरूवारी पहाटे एका भरधाव वाहनाने भीषण धडक दिली. या हृदयद्रावक घटनेत १४ कामगार गंभीर जखमी झाले असून, एका बैलाचा जागीच मृत्यू झाला आहे. तर पाच बैल गंभीर जखमी झाले आहेत.**

वृद्धेश्वर साखर कारखाना (पिंपळगाव कासार) येथे ऊसतोडणीसाठी हे कामगार आपल्या बैलगाड्यांसह जात होते. गुरुवारी पहाटे ६ वाजेच्या सुमारास तिसगाव–शेवगाव रस्त्यावर समोरून येणाऱ्या एका वाहनाने अचानक आपला ट्रॅक सोडून विरुद्ध दिशेला येत असलेल्या बैलगाड्यांना जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, बैलगाड्या सुमारे ▶▶ पान २ वर



### आ.सुरेश धस यांची तत्परता

घटनेची माहिती मिळताच आमदार सुरेश धस यांनी क्षणाचाही विलंब न लावता घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तातडीने पोलीस प्रशासनाशी संपर्क साधून रुग्णवाहिका आणि मदतीची व्यवस्था केली. घटनेनंतर पोलीस अधिकारी केदार, पालवे आणि पाथर्डी पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक पुजारी यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. आमदार सुरेश धस यांनी दोषी वाहनचालकावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी पोलीस प्रशासनाकडे केली आहे.

# राहुल गांधींच्या परदेश दौऱ्यावर पाळत?

नवी दिल्ली । प्रतिनिधी

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभेतील विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांच्या परदेश दौऱ्यांवरून देशातील राजकीय वर्तुळात नेहमीच चर्चा आणि आरोप प्रत्यारोप होत असतात. दरम्यान, इंडियन ओव्हरसिज काँग्रेसचे अध्यक्ष आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सॅम पित्रोदा यांनी राहुल गांधी यांच्या परदेश दौऱ्यांवरून केंद्र सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. परदेश दौऱ्यांदरम्यान, राहुल गांधींवर केंद्र सरकारकडून पाळत ठेवली जाते, असा आरोप सॅम पित्रोदा यांनी केला आहे. ▶▶ पान २ वर



# राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची ‘स्टार प्रचारकांची’ यादी जाहीर

## धनंजय मुंडे यांचा समावेश

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने (अजित पवार गट) आपली कंबर कसली असून, प्रचारासाठी ४० स्टार प्रचारकांची अधिकृत यादी गुरूवारी जाहीर केली आहे. यामध्ये अनेक दिग्गज नेत्यांसह धनंजय मुंडे यांचा समावेश आहे.**



पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या मान्यतेने ही यादी निवडणूक आयोगाकडे सुपूर्द करण्यात आली आहे. या यादीत पक्षाच्या दिग्गजांचा समावेश करण्यात आला आहे. प्रमुख स्टार प्रचारकांमध्ये अजित पवार, सुनील तटकरे, धनंजय मुंडे, बाबासाहेब पाटील, दत्तात्रय भरणे, आदिती तटकरे, धर्मरावबाबा ▶▶ पान २ वर

# बांगलादेशात जमावाकडून आणखी एका हिंदू तरुणाची हत्या



ढाका । वृत्तसंस्था

बांगलादेशात हिंदूवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. काही दिवसांपूर्वीच दीपू चंद्र दास या तरूणाला जमावाने आधी बेदम मारहाण करून ठार मारले आणि नंतर त्याला झाडावर लटकवून जाळल्याची संतापजनक घटना घडली होती. त्यानंतर आता बांगलादेशातील जमावाने आणखी एका हिंदू तरूणाला बेदम मारहण करून त्याचा जीव घेतल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. ▶▶ पान २ वर

# १९६५ पूर्वीच्या जुन्या हिंदी गाण्यांवर कोणाचाही मालकी हक्क नाही

## दिल्ली उच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निर्णय

दिल्ली । वृतसंस्था

लता मंगेशकर, मोहम्मद रफी, किशोर कुमार, आशा भोसले यांसारख्या दिग्गज गायकांनी गायलेली हिंदी चित्रपटसृष्टीची सुवर्णकाळातील गाणी आजही हॉटेल्स, कार्यक्रम, टीव्ही आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवर मोठ्या प्रमाणात ऐकली जातात. ही गाणी प्रामुख्याने सारेगामा इंडिया लिमिटेडशी संबंधित असली, तरी त्यांचे कॉपीराइट कायमस्वरूपी नसतात, हा महत्त्वाचा मुद्दा आता समोर आला आहे.

भारतातील कॉपीराइट कायदा १९५७ मधील कलम २७ नुसार, एखाद्या साउंड रेकॉर्डिंगचा कॉपीराइट हा त्याच्या पहिल्या प्रकाशनानंतरच्या वर्षापासून ६० वर्षे असतो. ही मुदत संपल्यानंतर ते गाणे पब्लिक डोमेन मध्ये जाते. म्हणजेच, अशा गाण्यांचा वापर करण्यासाठी कोणताही परवाना (लायसन्स) ▶▶ पान २ वर

# उन्नाव बलात्कारातील दोषीची जन्मठेप स्थगित

## पीडित कुटुंबीयांनाच पोलिसांकडून मारहाण; आदित्य ठाकरेंचा संताप

मुंबई । प्रतिनिधी

उत्तर प्रदेशातील उन्नाव बलात्कार प्रकरणातील दोषी भाजपच्या माजी आमदारास जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. मात्र, उच्च न्यायालयाकडून आमदार कुलदीपसिंह सेगर यास जामीन मंजूर करण्यात आल्याने देशभरातून संताप व्यक्त होत आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने सत्र न्यायालयाची जन्मठेपेची शिक्षा स्थगित केली आहे. आरोपीने अगोदरच ७ वर्षे ५



महिने शिक्षा भोगल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. त्यामुळे, देशभरातून संताप व्यक्त होत असून, पीडित कुटुंबीयांनीही न्यायालयाच्या या निर्णयानंतर न्यायासाठी ▶▶ पान २ वर

# राज्यातील शिक्षक, कर्मचारी वेतनापासून वंचितच

## सेवार्थ प्रणालीची प्रकरणे रखडल्याचा फटका

पुण । प्रतिनिधी

**वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या वेतनासाठी आवश्यक असलेली एचटीई सेवार्थ प्रणालीची प्रकरणे उच्च शिक्षण विभागाकडून लवकर मार्गी लागत नाहीत. काही ना काही कारणे दाखवित संबंधित प्रकरणे प्रलंबित ठेवली जात असल्याने शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना काही महिने वेतनापासून वंचितच रहावे लागत आहे. वेतनच मिळत नसल्याने आर्थिक अडचणी निर्माण होत असून, कुटुंबाचा उदरनिर्वाह करायचा कसा असा प्रश्न शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या पुढे उभा ठाकला आहे.**

उच्च शिक्षण विभागातील सेवार्थ प्रणालीमुळे वेतन प्रलंबित राहण्याच्या घटना अनेकदा घडत आहेत. प्रामुख्याने ऑनलाइन पोर्टलवरील तांत्रिक अडचणी, डेटा एंट्रीतील त्रुटी आणि वेळेवर मंजुरी न मिळणे या कारणांमुळे वेळेत वेतन मिळत नाही. या विरुध्द शिक्षक संघटनांनी अनेकदा आंदोलने करत शासनाचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्नही करण्यात आला. मात्र अद्याप पुर्णपणे प्रश्न काही सुटलेला नाही. अनेक वर्ष विभागीय सहसंचालक कार्यालय स्तरावरुन सेवार्थही प्रकरणे सोडविली जात होती. आता मात्र सेवार्थची प्रकरणे मंजूर करण्याबाबतचे विभागीय सहसंचालकांचे अधिकार काढून घेण्यात आले आहेत. सेवार्थ प्रणालीमध्ये विभागीय सहसंचालक यांच्या लॉगीनमधून नव्याने पदांचा समावेश करणे अथवा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा समावेश करणे ही सुविधा रद्द करण्यात आलेली आहे. शिक्षकीय व शिक्षकेत्तर कर्मचारी पदांच्या संदर्भात सर्व प्रकारच्या नोंदी घेणे, त्यामध्ये बदल करणे अथवा सुधारणा करणे तसेच ▶▶ पान २ वर



## थोडक्यात...

### चंद्रपुरात अपघात; चार महिला ठार, पाच जखमी

चंद्रपूरः नागपूरहून कागजनगरकडे जात असलेली मारुती सुझुकी इर्टिका कार पुलाखाली कोसळून झालेल्या भीषण अपघातात चार महिलांचा जागीच मृत्यू झाला, तर पाच जण गंभीर जखमी झाले. राजुरा तालुक्यातील सोंडो गावाजवळ ही घटना घडली. टीएस ०२ ईएन ५५४४ क्रमांकाची इर्टिका कार सोंडो गावाजवळील वळणाचा अंदाज न आल्याने चालकाचा ताबा सुटला आणि गाडी थेट पुलाखाली कोसळली. कार्यक्रम आटोपून नागपूरहून परत येत असताना चालकाला डुलकी लागल्याने हा अपघात घडल्याची प्राथमिक माहिती आहे. या प्रकरणी चालक अब्दुल रहमान याच्यावर कलम २८१, २२५ (बी), १०६ (१) बीएनएस तसेच मोटार वाहन कायद्याच्या कलम १८४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास ठाणेदार सुमित परतेकी करीत आहेत.

### नायलॉन मांजा वापरल्यास ५० हजारांचा दंड–हायकोर्ट

नागपूरः मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर पतंग उडवताना नायलॉन मांजामुळे होणारे जीवघेणे अपघात रोखण्यासाठी नागपूर उच्च न्यायालयाने अत्यंत कठोर पावले उचलली आहेत. यासंदर्भात न्यायालयाने प्रस्तावित दंडात्मक कारवाईचा मसुदा तयार केला असून, नागरिकांकडून सूचना व हरकती मागवल्यात. न्यायालयाच्या प्रस्तावानुसार, एखादा अल्पवयीन मुलगा नायलॉन मांजा वापरताना आढळल्यास त्याच्या पालकांना ५० हजार रुपये दंड भरावा लागेल. तसेच, विक्रेत्याकडे साठा आढळल्यास त्याला थेट अडीच लाख रुपयांच्या दंडाची तरतूद प्रस्तावित आहे. गृह विभागाने यासंदर्भात सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून हरकती नोंदवण्याचे आदेश दिलेत. यावर अंतिम सुनावणी ५ जानेवारी २०२६ रोजी होणार असून, त्यानंतर या नियमांची कडक अंमलबजावणी होण्याची शक्यता आहे.

### अरवली वाचवण्यासाठी नव्या खाणींना कायमची बंदी

दिल्लीः पर्यावरणवाद्यांच्या प्रदीर्घ लढ्याला मोठे यश आले असून, केंद्र सरकारने अरवली पर्वतरांगांच्या परिसरात नवीन खाण भाडेपट्टे देण्यावर पूर्णपणे बंदी घातलीये. गुजरातपासून दिल्लीपर्यंत पसरलेल्या या पर्वतश्रेणीचे संरक्षण करण्यासाठी केंद्राने राज्यांना कडक निर्देश दिलेत. या निर्णयांतर्गत अरवलीच्या संरक्षित क्षेत्राचा विस्तार केला जाणार असून, ‘आयसीएफआरई’ या संस्थेला शास्त्रोक्त व्यवस्थापन योजना तयार करण्यास सांगण्यात आलेय. यापुढे या भागात कोणतेही अनियंत्रित खाणकाम चालणार नाही, असे मंत्रालयाने स्पष्ट केले. या योजनेत पर्यावरणाची वहन क्षमता आणि संवेदनशील क्षेत्रांचे मूल्यांकन केले जाईल. पर्यावरणाचा ऱ्हास थांबवून या क्षेत्राचे पुनर्वसन करण्यावर आता भर दिला जाणार आहे. अरवली पर्वतरांगा वाचवा असे मोठे जनआंदोलन काँग्रेसने उभारले होते. अखेर या आंदोलनापुढे सरकारला झुकावे लागले.

### गुजरातच्या विधानसभा उपाध्यक्षांनी दिला राजीनामा

अहमदाबादः गुजरात विधानसभेचे उपाध्यक्ष जेठाभाई भारवाड यांनी गुरुवारी (२५ डिसेंबर) व्यस्त वेळापत्रक आणि इतर जबाबदाऱ्यांचे कारण देत आपल्या पदाचा राजीनामा दिला. राज्य सरकारने एका प्रसिद्धीपत्रकात याची घोषणा केली. भारवाड यांनी मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल आणि प्रदेश भाजप अध्यक्ष जगदीश विश्वकर्मा यांच्यासमवेत गांधीनगर येथील विधानसभा अध्यक्ष शंकर चौधरी यांच्या अधिकृत निवासस्थानी आपला राजीनामा सादर केला, असे त्यात म्हटले आहे. चौधरी यांनी राजीनामा स्वीकारल्याचे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. भरवाड (७५), ज्यांना जेठाभाई अहिर म्हणूनही ओळखले जाते. ते पंचमहल जिल्ह्यातील शेहरा मतदारसंघातून सहा वेळा आमदार म्हणून निवडून आले होते.

### एकाच कुटुंबातील चौघांची आत्महत्या

नांदेड : जिल्ह्याच्या मुदखेड तालुक्यातील मुरार गावात लखे कुटुंबातील चार जणांच्या मृत्यूने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. या कुटुंबातील दोन मुलांनी धावत्या रेल्वेखाली उडी घेऊन आत्महत्या केली. तर, घरी त्यांचे आई–वडील देखील मृतावस्थेत आढळल्याने गावकरी आणि पोलीस प्रशासनही चक्रावून गेले आहेत. आई–वडिलांचे मृतदेह घरामध्ये गळफास घेतलेल्या अवस्थेत मिळून आले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. गावात जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी भेट दिली. या घटनेतील मृतांच्या घराची पाहणी करत यात काही घातपात आहे का याची तपासणी पोलिसांनी केली. मात्र, सकृतदर्शनी आजारपण आणि आर्थिक तणावातून ही घटना घडली असल्याची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी माध्यमांना दिली. त्यामुळे, घातपात किंवा इतर कारणास्तव ही घटना घडल्याचा चर्चांना सध्यातरी पूर्णविराम मिळाला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२४ डिसेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४९.०० क्विंटल | २,२०० | २,९०० | २,४६८ |
| ज्वारी/हायब्रिड : ४२.०० क्विंटल | १,८०० | ३,००५ | २,६९३ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : २.०० क्विंटल | ६,२०१ | ६,२०१ | ६,२०१ |
| उडीद : ९.५० क्विंटल | ४,६०० | ४,८०० | ४,७०० |
| बाजरी: ३७.०० क्विंटल | १,८७० | ३,३४० | २,७२७ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,३०१ | ६,३०१ | ६,३०१ |
| सोयाबीन: १३०.५० क्विंटल | ४,४५० | ४,७०० | ४,५६९ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |

cmyk

## अग्रलेख

# काँग्रेसचे यश दखलपात्रच !

काँग्रेस पक्षाचा जनाधार अजूनही कमी झालेला नाही, हे जवळपास प्रत्येक छोट्या मोठ्या निवडणुकीतून अधोरेखित होत आहे. त्याचा काहीसा प्रत्यय चार दिवसांपूर्वीच निकाल लागलेल्या नगर परिषद व नगर पंचायतींच्या निवडणुकीतून आला. त्यातूनच नेतृत्वाने बहुधा बोध घेतला असावा. कारण, आगामी महानगरपालिका निवडणूक नियोजनात पक्षाने रस दाखवला आहे. राज्यातील महानगरपालिका निवडणुकांसाठी स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. त्यात राष्ट्रीय स्तरापासूनच्या नेत्यांचा समावेश आहे. नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या निवडणुकांमधील पक्षाची कामगिरी उत्साहवर्धक म्हणावी लागेल.

राज्यस्तरीय आणि केंद्रीय पातळीवरही नेतृत्वाने या निवडणुका फारशा गांभीर्याने घेतल्या नव्हत्या. प्रचारासाठी कोणतेही बडे नेते आले नव्हते. तरीही पक्षाचे एक्केचाळीस नगराध्यक्ष आणि हजारभर तरी नगरसेवक निवडून आले. फारसे कष्ट न घेताही मतदारांनी हे दान काँग्रेसच्या पदरात टाकले. कारण पक्ष अजूनही लोकांच्या मनात आहे. या निवडणुका स्थानिक संपर्क आणि संबंधांवर लढवल्या जातात असे मानले जाते. हे जरी खरे असले तरी त्या कार्यकर्त्यांची निष्ठा पक्षनेतृत्वाने कौतुक करावी अशीच मानली जाईल. भाजपचा सत्तेचा वारू देशात चौखूर उधळला आहे. उधळत्या घोड्यावर स्वार होण्याची अनेकांची इच्छा असते. तद्वतच, भाजपत प्रवेश करणाऱ्यांची संख्या लक्षणीय नसती तरच नवल. कोणतीही निवडणूक लागली की अशा गयारामांची संख्या वाढते. ज्यांची हयात काँग्रेस पक्षात गेली त्यांनाही तो मोह आवरलेला नाही. या पार्श्वभूमीवर स्थानिक पातळीवरील उपरोक्त कार्यकर्ते पक्षात टिकून राहिले. तिकीट मिळवले आणि त्यावर निवडून देखील आले. पक्षाचा पाठिंबा नसल्याची ओरड क्वचितच ऐकू आली असू शकेल. हा त्या कार्यकर्त्यांचा पराक्रम आहे. वर्षानुवर्षे दाखवलेल्या निष्ठेचे फळ त्यांना मिळाले आहे. राजकीय पातळीवर पक्षाचे मानसिक आणि सामाईक खच्चीकरण सुरू असतानाही पक्षनिष्ठा जोपासणे वाटते तितके सोपे नसते. भलेभले पक्ष सोडून गेले आहेत. यातून सर्व पातळ्यांवरील काँग्रेस नेतृत्वानेही बोध घेणे गरजेचे आहे. आता पाळी नेतृत्वाची आहे. वाऱ्यावर सोडले अशी भावना निष्ठावान कार्यकर्त्यांचे भावनिक खच्चीकरण करू शकते. लोक अजूनही काँग्रेसला मत देतात. पक्षाचे उमेदवार निवडून देतात. ही पक्षाच्या पूर्वसूरींची पुण्याई आहे. ज्यात भर पडणे कार्यकर्त्यांना अपेक्षित असते. निवडणूक हे त्याचे एक प्रमुख माध्यम मानले जाते. एक प्रमुख विरोधी पक्ष म्हणून जनता काँग्रेसकडे बघते.

भारतीय जनता पक्षाला पर्याय म्हणून लोक काँग्रेसचा विचार करतात, असाही याचा अर्थ होऊ शकेल. लढाई भारतीय जनता पक्षाशी आहे. तो पक्ष सतत निवडणूक लढवण्याच्या मानसिकतेत असतो असे म्हंटले जाते. एका निवडणुकीतील विजय साजरा करताना पुढच्या निवडणुकीची तयारी सुरू असते असे राजकीय विश्लेषक म्हणतात. उदाहरणार्थ, या पक्षाच्या स्टार प्रचारकांची यादी सुमारे महिनाभरापूर्वीच जाहीर केली गेली आहे. कोणतीही निवडणूक पक्ष नेतृत्व गंभीरपणे घेतो. उपरोक्त निवडणुकीतील विजयी उमेदवारांचे खुद्द पंतप्रधानांनी अभिनंदन केले. तसे इतर पक्षातील प्रमुखानी क्वचितच केलेले असू शकेल. हीच दखल कार्यकर्त्यांचे मनोबल चांगलेच वाढवते. त्यांना पक्षाशी बांधून ठेवते. ही कला, निवडणूक नियोजनातील बारकावे, उमेदवार निवड, त्याला पक्षीय पाठबळ, प्रचाराचे सार्वत्रिक धोरण यातील बारकावे आत्मसात करण्याला काँग्रेसने प्राधान्य देणे गरजेचे ठरू शकेल. तसे दिले गेले तर काँग्रेसला अजूनही भवितव्य आहे. स्टार प्रचारक नेमणे हे त्या दिशेने पडलेले पहिले पाऊल ठरू शकेल आणि महानगरपालिका निवडणूक ही त्याची चाचणी मानली जाऊ शकेल. या निवडणुकांमध्ये कोणाशीही युती करणार नसल्याच्या धोरणावर नेतृत्व ठाम आहे. त्याची किंमत मोजायची त्यांची तयारी असू शकेल. महापालिका निवडणुकीचे कार्यक्षेत्र, प्रभाव मोठा असतो. त्यांचा अर्थसंकल्पही मोठाच असतो. त्यामुळेच या निवडणुका सगळे पक्ष गंभीरपणे घेतात. आता त्यात काँग्रेसचा समावेश केला जाऊ शकेल. तळागाळात रुजलेल्या प्रतिमेचा, ठरवले तर दीर्घकालीन फायदा करून घेतला जाऊ शकेल असेच नियोजन पक्षाला करावे लागेल. बाकी काँग्रेस पक्षाचे चिन्ह आणि पक्षप्रतिमा अनेक नागरिकांच्या मनात खोलवर रुजलेली आहे हे वास्तव सगळेच राजकीय पक्ष निदान आता तरी खासगीत कदाचित मान्य करतील.

# आदर्श गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी केली अंतराळाची सफर

## आदर्श गुरुकुलची पाच दिवसीय सहल परतली

**माजलगाव । प्रतिनिधी**

**भारतीय जन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, आदर्श गुरुकुलची सहल उपक्रम दि.१९ ते २५ डिसेंबर दरम्यान पाच दिवस शैक्षणिक सहलीचे आयोजन केशव बादाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. नेहरू तारांगण हे अवकाश प्रेमी आणि शैक्षणिक संशोधनासाठी एक प्रमुख ठिकाण आहे,अंतराळ पाहून विद्यार्थी प्रभावित झाले, खगोलशास्त्र आणि अवकाश विज्ञानाला प्रोत्साहन देण्यासाठी स्थापन केलेलेआहे. सहाशी पर्यटन,वन पर्यटन, ऐतिहासिक पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन, विद्यार्थ्यांनी विविध पर्यटन स्थळांना भेटी देऊन ही सहल आनंदात सुखरूप परतली.**



सहलीची सुरुवात वारकऱ्याचे आराध्य दैवत श्री.विठ्ठल- रखुमाई तीर्थक्षेत्र पंढरपूर येथून सुरुवात करण्यात आली.तसेच श्री.करवीर निवासीनी आई महालक्ष्मी अंबाबाईचे मंदिर,श्री दत्त मंदिर नरसोबाची वाडी, श्री. कोपेश्वर मंदिर खिद्रापूर, रंकाळा तलाव, शालिनी पॅलेस, न्यू शाहू पॅलेस, ज्योतिबा मंदिर,पन्हाळा किल्ला, पावनखिंड, वाई गणपती मंदिर सत्याग्रह व चित्रपट शूटिंग पॉईंट,पंचगणी, प्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण महाबळेश्वर मंदिर व दहा पर्यटन स्थळे - पंचगंगा कृष्णा ,वेण्णा, कोयना, सावित्री, गंगोत्री या पाच नद्यांचे उगमस्थान प्रतापगडावरील पराक्रमाची माहिती, टेहळणी बुरुज,अफजल खानाची समाधी तसेच महाडचे चवदार तळ्याचा सत्याग्रह ठिकाण , स्वराज्याची राजधानी किल्ले रायगड, अभेद्य किल्ला जंजिरा, जंजिरा किल्ल्यास शह देण्यासाठी बांधला गेलेला - पद्मदुर्ग, अलिबाग, महाराष्ट्राची राजधानी मुंबई येथील गेटवे ऑफ इंडिया, छत्रपती शिवाजी महाराज वास्तु संग्रहालय, जहांगीर आर्ट गॅलरी, हँगिंग गार्डन, मरीन ड्राईव्ह, नेहरू विज्ञान केंद्र, नेहरू तारांगण, प्रमोद नवलकर प्रेक्षक गॅलरी, अष्टविनायकापैकी एक वरद विनायक महडचा गणपतीचे दर्शन घेऊन सहलीचा समारोप केला. आपले या सहलीचे मार्गदर्शन केशव बादाडे यांनी केले. सहकार्य दत्तात्रय माने, रत्नेश्वर शेंडगे, सावित्री बादाडे, अंजली घाडगे,शितल शेंडगे,स्वरूपा बादाडे, गोविंद वाशिंबे,वेदांत ढगे,पर्यटक स्वारी भोजराज ट्रॅव्हल्स, चालक- दत्तात्रय आरडे ,अशोक होके यांच्यासह आदर्श गुरुकुलच्या चाळीस विद्यार्थ्यांनी सहलीचा आनंद घेतला.

# नफरवाडीचे दोन तरुण भारतीय सैन्य दलात भरती झाले

## आ.सुरेश धस यांच्याकडून अभिनंदन

**पाटोदा । प्रतिनिधी**

लहानसं गाव,साधी घरं,शेतीवर अवलंबून असलेली कुटुंबं आणि मर्यादित साधनं असूनही मोठी स्वप्नं उराशी बाळगून पाटोदा तालुक्यातील नफरवाडी या गावातील सार्थक तुकाराम तांबे आणि अजय किसन मंडलिक या दोन तरुणांनी भारतीय सैन्य दलात भरती होऊन ग्रामीण भागातूनही देशसेवेच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचता येते हे ठामपणे सिद्ध केले आहे.शेतकरी कुटुंबातील अत्यंत सामान्य आर्थिक परिस्थितीत वाढलेल्या या तरुणांचा प्रवास संघर्षमय असला तरी त्यांनी परिस्थितीपुढे हार मानली नाही; पहाटे शेतातील काम, त्यानंतर सातत्यपूर्ण सराव,धावणे, कठोर व्यायाम आणि शिस्तबद्ध जीवनशैली या जोरावर त्यांनी डिसेंबर महिन्यात पुणे येथे झालेल्या भारतीय सैन्य दलाच्या भरती प्रक्रियेत जिद्दीने सहभाग घेतला आणि अखेर यश मिळवले.यामध्ये सार्थक तांबे याची भारतीय सैन्य दलाच्या जीडी (जनरल ड्युटी) विभागात तर अजय मंडलिक याची तांत्रिक विभागात निवड झाली असून दोघेही आज सैन्य प्रशिक्षणासाठी पुणे येथे रवाना होत आहेत;



त्यामुळे नफरवाडी गावात आनंद,अभिमान आणि समाधानाचे वातावरण पसरले आहे.विशेष म्हणजे,नुकतेच पाटोदा तालुक्यातील चुंबळी येथील काही तरुणांचीही भारतीय सैन्य दलात निवड झाल्याने तालुक्यात देशसेवेची सकारात्मक लाट निर्माण झाली असून, ग्रामीण तरुणांचा कल सैन्यदल, पोलीस दल आणि राष्ट्रसेवेच्या दिशेने वेगाने वाढत असल्याचे आशादायी चित्र दिसत आहे.या यशातून व्यसनांपासून दूर राहून सातत्यपूर्ण मेहनत, शारीरिक तंदुरुस्ती आणि आत्मविश्वासाच्या जोरावर कोणतेही स्वप्न साकार करता येते, असा ठोस संदेश मिळत असून नफरवाडी व चुंबळीसारख्या गावांतील तरुण आज इतरांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत. या दोन्ही तरुणांच्या यशाबद्दल आष्टीपाटोदाशिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी त्यांचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या असून ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील तरुण देशसेवेचा मार्ग स्वीकारत आहेत ही अत्यंत अभिमानाची बाब असल्याचे नमूद केले आहे.

# वर्षा आजिनाथ शेरकर यांना सामाजिक राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

## गंगाई -बाबाजी महोत्सवाचा सोहळा १ जानेवारीला रंगणार

**बीड । प्रतिनिधी**

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे आष्टी येथील भगवान महाविद्यालयाच्या वतीने आयोजित गंगाई - बाबाजी कला रोप्य महोत्सव २०२५-२०२६ अंतर्गत विविध क्षेत्रातील मान्यवरांना राज्य पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.यात बीड जिल्ह्यातील राजकारणातील भीष्म पितामह म्हणून ओळखले जाणारे माजी मंत्री या.शिवाजीराव पंडित (दादा) यांना या वर्षीचा जीवन गौरव तर बीड जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट व भरिव कामगिरी बद्दल मा.सुभाषचंद्रजी सारडा यांना राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार जाहीर झाला आहे यात विविध क्षेत्रातील मान्यवर सोबत मागील १८ वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, व्यसनमुक्ती क्षेत्रात समुपदेशक व कौटुंबिक सल्लागार म्हणून काम करत असेलेल्या सौ.वर्षा आजिनाथ शेरकर यांना राज्यस्तरीय सामाजिक पुरस्कार जाहीर झाला आहे . सध्या सौ वर्षा आजिनाथ शेरकर या जनसेवा व्यसनमुक्ती केंद्र घाटसावळी येथे कौटुंबिक सल्लागार समुपदेशक म्हणून काम पाहत आहेत त्यांना मिळालेल्या या पुरस्काबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे



# जालना जिल्ह्यात नाताळ उत्साहात साजरा

**जालना । प्रतिनिधी**

**जालना जिल्ह्यात ख्रिसमस (नाताळ) सण मोठ्या श्रद्धा, भक्ती व आनंदाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. जुना जालना, बेथलेहेम गांव व जिल्ह्यातील विविध चर्चमध्ये विशेष प्रार्थना, भक्ती व आराधना कार्यक्रमांचे आयोजन नाताळानिमित्त करण्यात आले होते.**

नवीन जालना येथील मिशन हॉस्पिटल परिसरातील क्राईस्ट चर्च कॅथेड्रल जुना जालना भागातील नुतन वसाहत येथील टॉम डॉप्सन मेमोरियल चर्च तसेच बेथलेहेम येथील चर्चमध्ये ख्रिसमस निमित्ताने भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. यावेळी चर्चमध्ये विशेष भक्ती व आराधना घेण्यात आली. प्रभू येशूच्या जन्मावर आधारित उपदेश देण्यात आला. या उपदेशातून प्रेम, क्षमा, दया, नम्रता, सत्याचा मार्ग, मानवसेवा व शांततेचा संदेश देण्यात आला. प्रभू येशूचा जन्म हा संपूर्ण मानवजातीसाठी आशा, तारण व नवजीवनाचा संदेश देणारा असल्याचे सांगण्यात आले. यावेळी धार्मिक गीतांचे सादरीकरण करण्यात आले. चर्चमध्ये टॉम डॉप्सन तरुण मंडळाने केलेली सजावट विशेष लक्षवेधी ठरली. ख्रिसमस ट्री, आकर्षक विद्युत रोषणाईमुळे संपूर्ण परिसर उजळून निघाला होता. जालना जिल्ह्यातील ख्रिस्ती समाजाचे गाव म्हणून ओळख असलेल्या बेथलेहेम




गावातही नाताळ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. येथे चर्चमध्ये करण्यात आलेली सजावट व विद्युत रोषणाई अत्यंत सुंदर दिसत आहे. प्रभू येशूच्या जन्माचा देखावा (गव्हाणी) खुप मनमोहक पद्धतीने सादर करण्यात आली असून. गव्हाणी बघण्यासाठी या ठिकाणी नागरिकांची गर्दी होत आहे. चर्चवरील विद्युत रोषणाईमुळे संपूर्ण बेथलेहेम गावाचा परिसर प्रकाशाने झगमगत आहे. या सुंदर सजावटीमुळे यंदा बेथलेहेम येथील चर्च परिसर खुप सुंदर दिसत आहे. विशेष आकर्षण असलेल्या प्रभू येशूचा जन्मदेखावा पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी बेथलेहेम गावातील चर्चमध्ये होत आहे. जालना शहरातील टॉम डॉप्सन मेमोरियल चर्च येथे सुध्दा नाताळ निमित्त ख्रिस्त जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून दि. २६ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता प्रभू येशूच्या जन्मावर आधारित नाटिका सादर करण्यात येणार आहे. ख्रिस्त जन्मोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेले हे कार्यक्रम दि. ३० डिसेंबरपर्यंत चालणार असून दररोज भाविकांसाठी विशेष प्रार्थना, भक्ती, आराधना व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तर दि. २८ रोजी संध्याकाळी ७ वाजता धार्मिक चित्रपट दाखविण्यात येणार आहे तसेच या कार्यक्रमांना जालना शहरासह परिसरातील ख्रिस्ती बांधव व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

# द्रोपदाबाई अंबेकर यांचे निधन

**जालना । प्रतिनिधी**

भास्करराव अंबेकर जालना जिल्हा संपर्क प्रमुख शिवसेना यांच्या मातोश्री गं.भा. द्रोपदाबाई राजाराम अंबेकर वय (९३) यांचे दि २५ डिसेंबर रोजी सकाळी वृद्धपकाळाने दुःखद निधन झाले असून त्यांचेवर गुरुवारी दुपारी रामतीर्थ स्मशानभूमी जालना येथे अंत्यविधी करण्यात आली यावेळी सर्व पक्षाचे आमदार माजी आमदार वकील पत्रकार शिक्षक व्यापारी अधिकारी कर्मचारी होते.



## पान १ वरून...

### वन जमिनीवर शेती करता येणार नाही;

भाडेपट्ट्याची मुदतवाढ मिळण्याचा कोणताही अधिकार निर्माण होत नाही. असेही नमूद केले. सध्याच्या कायद्यांनुसार वनजमिनींचा वापर बिगर-वनीकरणासाठी करता येत नाही आणि त्यात शेतीचाही समावेश होतो. त्यामुळे अशा प्रकारच्या परवानग्या देणे कायद्याच्या विरोधात असल्याचे न्यायालयाने निकालात स्पष्ट केले.

-----------

### आष्टी तालुक्यात उसाच्या ७ बैलगाड्याला

२०० फूट लांब फरफटत गेल्या. या अपघातात एकूण १४ जण जखमी झाले आहेत. त्यापैकी पूजा नाना शेंडगे (वय ३०) आणि शरद शेंडगे (वय ४०) यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना तातडीने अहिल्यानगर येथील इंपल्स हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले आहे. उर्वरित १२ जखमींवर तिसगाव येथील हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. त्यामध्ये अभिषेक मरगळ, विशाल मरगळ कोमल ठेंगल, राणी ठेंगल, अशोक ठेंगल सीमा शेंडगे, संगीता शेंडगे, बबन शेंडगे, लिलाबाई शेंडगे, आदित्य शेंडगे, तुळजाई शेंडगे आणि राणी गोल्हार बहुतेक जखमींना गंभीर स्वरूपाचे फ्रॅक्चर आणि अंतर्गत जखमा झाल्या आहेत.

-----------

### बांगलादेशात जमावाकडून

प्राप्त माहितीनुसार, बांगलदेशी जमावाने अमृत मंडल उर्फ सम्राट या २८ वर्षीय तरूणाची हत्या केली आहे. ही घटना राजबारी जिल्ह्यात घडली. पांगशा मॉडेल पोलिस स्टेशनने या घटनेची पुष्टी केली आहे. पोलिसांचे म्हणणे आहे, की स्थानिक रहिवाशांनी अमृत मंडलवर खंडणीचा आरोप केला होता, ज्यामुळे तो जमावाच्या हिंसाचाराचा बळी ठरला. पोलिसांच्या रेकॉर्डमध्ये अमृत मंडलचे नाव स्थानिक टोळीचा प्रमुख असे नोंदवले गेले आहे. याशिवाय, मंगळवारी, चितगावजवळील रौजन परिसरात एका हिंदू कुटुंबाचे घर जाळण्यात आले. रौजन परिसरात पाच दिवसांत सात हिंदू कुटुंबांची घरे जाळण्यात आली आहे. तर या प्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत पाच संशयितांना अटक केली आहे. या आगोदरच्या घटनेने देशभरात निदर्शने सुरू झाली आहेत. शिवाय आंतरराष्ट्रीय स्तरावरूनही बांगलादेश सरकारला सुनावले गेले आहे. तरीही पुन्हा एका हिंदू तरूणाचा जमावाने जीव घेतला आहे. त्यामुळे बांगलादेशातील हिंदूंच्या सुरक्षेचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. दरम्यान, मानवाधिकार संघटना ऐन ओ सालिश केंद्राने २०२५ मध्ये बांगलादेशात आतापर्यंत हिंसाचारात १८४ जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त दिले आहे.

-----------

### राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार

आत्राम, संजय बनसोडे, नवाब मलिक, मुश्ताक अंतुले, अमोल मिटकरी, रूपाली चाकणकर, अनिकेत तटकरे, राजेंद्र जैन, सिद्धार्थ टी. कांबळे, लहुजी कानडे, सुनिल मगरे, महेश शिंदे, सुरेखाताई ठाकरे, प्रतिभा शिंदे, प्रफुल्ल पटेल, हसन मुश्रीफ, नरहरी झिरवाळ, मकरंद जाधव-पाटील, अण्णा बनसोडे, इंद्रनील नाईक, अनिल पाटील, प्रताप पाटील चिखलिकर, सयाजी शिंदे, समीर भुजबळ, सना मलिक, इद्रिस नायकवाडी, इशान सिद्दीकी, शरद पाटील, सुरज चव्हाण, कल्याण आखाडे, नाझेर काझी, राजलक्ष्मी भोसले, नजीब मुल्ला, विकास पासलकर यांचा समावेश आहे.

-------------

### राहुल गांधींच्या परदेश

सॅम पित्रोदा यांनी राहुल गांधी यांच्या परदेश दौऱ्यांवरून भाजपाकडून करण्यात येणारे आरोप फेटाळून लावले. तसेच परदेश दौऱ्यांदरम्यान भारतीय दूतावासामधील लोक राहुल गांधींवर पाळत ठेवून असतात. तसेच अनेक परदेशी नेत्यांना राहुल गांधी यांची भेट घेऊ नका, असे सांगितले जाते, असा आरोप पित्रोदा यांनी केला. राहुल गांधी यांनी हल्लीच जर्मनीचा दौरा केला होता. या दौऱ्यावेळी राहुल गांधी यांनी भारतामधील लोकशाहीच्या स्थितीसह अनेक मुद्यांवर परखड भाष्य केले होते. दरम्यान, राहुल गांधी यांच्या या दौऱ्याच्या टायमिंगवरून अनेक सवाल उपस्थित करण्यात आले होते. आता सॅम पित्रोदा यांनी हे आरोप फेटाळून लावले आहेत. ते म्हणाले की, आता परदेश दौरे हे अचानक होत नाहीत. तर अनेक महिन्यांपूर्वी त्यांचे नियोजन होते. जर्मन दौऱ्याचा मुख्य हेतू हा पुरोगामी आघाडीची बैठक हा होता. त्यात सुमारे ११० देशातील पुरोगामी पक्ष सहभागी झाले होते. यावेळी राहुल गांधींवर परदेशात जाऊन भारत विरोधी वक्तव्ये करत असल्याच्या होणाऱ्या आरोपांबाबत सॅम पित्रोदा यांनी परखड शब्दात प्रत्युत्तर दिले. आजच्या काळात तुम्ही भारतामध्ये जे काही बोलता ते जगभरात पसरते आणि जे बाहेर बोलता ते देशात पसरते. खरंतर तुम्हा देशात बोला अगर परदेशात बोला, सत्य हे सत्यच असते असा टोलाही पित्रोदा यांनी लगावला. जर काँग्रेसला संस्थांवर कब्जा होत आहे, प्रसारमाध्यमे पक्षपात करत आहेत, सिव्हिल सोसायटीला कमकुवत केले जात आहे असे वाटत असेल तर ही बाब देशातही सांगितली जाईल आणि परदेशातही सांगितली जाईल, असेही पित्रोदा यांनी सांगितले. दरम्यान, राहुल गांधी यांच्या परदेश दौऱ्यादरम्यान, भारतीय दूतावासातील अधिकारी सातत्याने त्यांच्या हालचालींवर पाळत ठेवून असतात. हॉटेलपासून बैठकांपर्यंत तसेच विमानतळांवर लोक आमच्यावर लक्ष ठेवून असतात. एवढेच नाही तर दुतावासामधील लोक फोन करून राहुल गांधी यांना भेटू नका असे विदेशी नेत्यांना सांगतात, असा दावाही सॅम पित्रोदा यांनी केला.

-----------

### उन्नाव बलात्कारातील दोषीची

आंदोलनाचा मार्ग अवलंबला. मात्र, आंदोलनकर्त्या पीडित मुलीच्या आईसह मुलीला पोलिसांनी पकडून नेले. आता, या घटनेवर शिवसेना उबाठाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी तीव्र शब्दात संताप व्यक्त केला आहे. उन्नाव बलात्कारातील दोषी भाजप आमदाराला उच्च न्यायालयाकडून जामीन देण्यात आल्यानंतर आदित्य ठाकरेंनी संताप व्यक्त करत पीडित कुटुंबीयांसाठी आवाज उठवण्याचे आवाहन केले आहे. उन्नाव बलात्कार प्रकरणातील दोषी, भाजपचे माजी आमदार कुलदीप यांची शिक्षा स्थगित केल्याने जगभरात संतापाची लाट उसळली आहे. याशिवाय, बलात्कारी व्यक्तीविरुद्ध निषेध करणाऱ्या पीडितेला आणि तिच्या आईला पोलिसांनी केलेली मारहाण धक्कादायक आहे. निवडणुकीच्या काळात भाजपने लाडकी बहीणसारख्या घोषणा दिल्या आणि योजना आखल्या. मात्र, आज पीडितेसोबत आणि आंदोलन करणाऱ्या तिच्या कुटुंबीयांसोबत काय घडतयं, असा सवाल आदित्य यांनी उपस्थित केला. जगभरातील देश आणि लोक हे पाहतील, यावर बोलतील. परंतु भारतात आंदोलनकर्त्यांवरच हुकूमशाही पद्धतीने टीका होत असून मंत्री देखील या पीडितांच्या आंदोलनाची टिंगल करतात. आपण हेच करायला आलो आहोत का? बलात्काराच्या आरोपात दोषी ठरलेल्या माणसाला सर्वात कठोर शिक्षा मिळायला हवी होती, पण त्याला जामीन का मिळाला? हा न्याय आहे का? हे मानवीय आहे का? असा सवाल आदित्य ठाकरेंनी उपस्थित केला आहे. तसेच, जोपर्यंत दोषींना न्याय मिळत नाही, तोपर्यंत सर्वांनी याबद्दल बोलणे पाहिजे, तसेच या घटनेचा निषेध करणे थांबवूच नये, असेही आदित्य ठाकरेंनी म्हटले आहे.

-------------

### १९६५ पूर्वीच्या जुन्या हिंदी गाण्यांवर

घेण्याची गरज नाही. उदाहरणार्थ, १९६५ साली प्रसिद्ध झालेल्या गाण्यांचा कॉपीराइट २०२५ च्या अखेरीस संपतो. त्यामुळे १९५० आणि १९६० च्या सुरुवातीला आलेली अनेक लोकप्रिय हिंदी गाणी लवकरच सार्वजनिक वापरासाठी खुली होत आहेत. ऑक्टोबर २०२५ मध्ये बिगनेट एलएलपी या संस्थेला एका खासगी कार्यक्रमात काही जुनी हिंदी गाणी वाजवण्यासाठी परवाना घेण्यास सांगण्यात आले. याविरोधात बिगनेटने दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली. त्यानंतर न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. आता तज्ज्ञांच्या मते, जुन्या गाण्यांची मूळ तारीख आणि सार्वजनिक स्वरूपात उपलब्ध असणे गरजेचे आहे. त्यामुळे कोणते गाणे अजूनही कॉपीराइटमध्ये आहे आणि कोणते मुक्त झाले आहे, हे सर्वांना सहज समजू शकेल. या निर्णयामुळे एक महत्त्वाचा मुद्दा समोर आला आहे. दरवर्षी अनेक जुनी गाणी कॉपीराइटमुक्त होत आहेत.

-------------

### राज्यातील शिक्षक, कर्मचारी

त्या अनुषंगाने इतर बदल करणे अशी सर्व प्रकरणे शासनस्तरावरील प्रशासकीय विभागास मान्यतेसाठी सादर करावी लागतात. प्रशासकीय विभागाच्या मान्यतेनंतर विभागीय सहसंचालक यांना टॅब उपलब्ध केल्यानंतर विभागीय सहसंचालकांना पुढील कार्यवाही करता येते. शालेय शिक्षण विभागातील शालार्थ आयडीचे घोटाळे राज्यभरात उघडकीस येत आहे. या पार्श्वभुमीवर उच्च शिक्षण विभागाकडून सेवार्थबाबतच्या प्रकरणांच्या सर्व कागदपत्रांची कसून तपासणी करण्याचा धडाकाच लावला आहे. त्यामुळे तपासणीच्या नावाखाली सेवार्थची प्रकरणे चार-सहा महिने प्रलंबितच पडत आहेत. सेवार्थबाबतची प्रकरणे तात्काळ मंजूर करुन संबंधित शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे वेतन सुरु करावे अशी मागणी जोर धरु लागलेली आहे. त्यामुळे आता तरी शासनस्तरावरील प्रशासकीय यंत्रणेला जाग येणार की नाही असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि. २६ डिसेंबर २०२५



## थोडक्यात



माजलगाव:– तालुक्यातील पात्रुड ग्रामपंचायत कार्यालयास मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी सदिच्छा भेट दिली असतांना मनोज दादा जरांगे पाटलांचा सत्कार करताना सरपंच लतीफ मोमीन व सामाजिक कार्यकर्ते एकनाथ मस्के



### जमीन आणि मानवाचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी नैसर्गिक शेती काळाची गरज –चाटे

माजलगाव । प्रतिनिधी

तालुका कृषी अधिकारी माजलगाव च्या वतीने पुरुषोत्तमपुरी येथे राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानांतर्गत काल एकदिवसीय शेतकरी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते

या वेळी उपस्थित शेतकऱ्यांना संबोधित करताना आतिश चाटे मंडळ कृषी अधिकारी केसापुरी यांनी रासायनिक खताच्या व कीडनाशकाच्या अतिवापरामुळे खराब झालेले जमिनीचा पोत,जमिनीची सुपीकता वाढलेले चोपण जमिनीचे प्रमाण हे कमी करण्यासाठी नैसर्गिक संसाधनाचा वापर करून तसेच वेगवेगळ्या प्रकारच्या जैविक व सेंद्रिय निविष्ठांचा वापर केल्यामुळे जमिनीची आरोग्य टिकविण्यास मदत होते तसेच नैसर्गिक पद्धतीने पिकविलेल्या अन्नधान्य, कडधान्य आणी भाजीपाला उत्पादनामुळे मानवाच्या आरोग्य अबाधित ठेवण्यास मदत होते असे सांगितले. प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित असलेले वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी अण्णासाहेब जगताप यांनी नैसर्गिक शेतीसाठी लागणाऱ्या विविध निविष्ठा कशा प्रकारे तयार करायचे आणि त्याचा वापर कसा करायचा याविषयी शेतकऱ्यांना माहिती सांगितली कार्यक्रमाचे प्रस्ताविक गोपीनाथ पवार तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक माजलगाव यांनी केले या कार्यक्रमाला कृषी सखी गटातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आभार प्रदर्शन श्रीमती रोहिणी शिंदे कृषी सेविका पुरुषोत्तम पुरी यांनी केले.



माजलगाव:– मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे हे पात्रुड येथे आले असता त्यांचा सत्कार माजलगाव पंचायत समितीचे माजी उपसभापती डॉ. वसिम मनसबदार व त्यांच्या सहकाऱ्यांनी केला.

# राष्ट्रीयकृत बँकांनी पीक कर्जाची मर्यादा वाढवली

## शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी १,४५००० हजार रुपये पीक कर्ज मिळणार

बीड । प्रतिनिधी

दिनांक २५ १२ २०१५ राष्ट्रीयकृत बँकांनी शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्याच्या रकमेत वाढ केलेली आहे प्रति हेक्टरी ३५००० रुपयांनी राष्ट्रीयकृत बँकांनी मर्यादा वाढवलेली आहे म्हणजे आता एक लाख ४५ हजार रुपये दिले जाणार आहेत त्याचबरोबर दोन लाखापेक्षा अधिक पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना सर्च रिपोर्टची अट ठेवल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे जिल्ह्यात शेतकऱ्यांना ३००० कोटी पर्यंत पिक कर्ज वाटप सहकारी व राष्ट्रीयकृत बँकांच्या माध्यमातून केले जाते नाबार्डच्या निकषानुसार या वित्तीय संस्था शेतकऱ्यांना कर्ज वाटप




करतात पीक कोणते आहे त्यावर पीक कर्जाची मर्यादा नाबार्डने निश्चित करून दिली आहे त्यानुसारच वाटप करणे बँकांना बंधनकारक केलेले आहे. मात्र अलीकडे रासायनिक खते, पाणीपट्टी, वीज बिले, मजुरी, मशागतीच्या वाढलेल्या खर्चामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे शेतीमालाचा वाढलेला उत्पादन खर्च पाहून नाबार्डने पीक कर्जामध्ये वाढ केलेली आहे यापूर्वी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने कर्जाची मर्यादा वाढवली होती पण राष्ट्रीयकृत बँकां शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी एक लाख दहा हजार रुपये देत होत्या यामध्ये वाढ करावी अशी मागणी शेतकऱ्यांची होती त्यानुसार या बँकांनीही एक लाख पंचेचाळीस हजार रुपये मर्यादा वाढवली आहे त्याचा फायदा शेतकऱ्यांना होणार असल्याचे सांगण्यात येत आहे जिल्हा बँकेने ते एक ते दीड लाख रुपये केले जिल्हा बँक उसाच्या लागन पिकासाठी गुंठ्याला दीड हजार रुपये म्हणजेच हेक्टरी दीड लाख रुपये पीक कर्ज देते त्याचबरोबर उसाच्या खोडवा पिकासाठी गुंठ्याला एक हजार दोनशे पन्नास रुपये दिले जातात सोने तारणाला सिबिल सक्ती का कर्जदाराचे शिबिल तपासल्याशिवाय कोणतीच वित्तीय संस्था कर्ज देत नाही कर्जदराची परतफेडची क्षमता पाहण्यासाठी हे योग्य असले तरी आता सोनेतारण कर्जासाठी सिबिल तपासले जात आहे सोने तारण हे सर्वात सुरक्षित कर्ज असताना सिबिलची सक्ती का असा प्रश्न इतर ग्राहकांमधून विचाराला जात आहे तरी बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या राष्ट्रीयकृत बँकांनी वाढवलेल्या पीक कर्जाचा लाभ घ्यावा असे आव्हान ग्रामीण संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्रा. बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केला आहे

## पाली येथे तहसीलदार शेळके यांची आढावा बैठक

बीड । प्रतिनिधी

महसूल मंडळ पाली येथे तहसीलदार शेळके यांच्या अध्यक्षतेखाली मंडळ स्तरीय आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस मंडळातील शेतकरी, ग्रामसेवक, पोलीस पाटील, आशा सेविका, ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शासनाचा सुशासन सप्ताह हा उपक्रम साजरा करण्यात आला. बैठकीदरम्यान शेतकऱ्यांना विविध प्रकारची प्रमाणपत्रे व दाखले वितरित करण्यात आले. यामध्ये ऊसतोड कामगार ओळखपत्र, धरणग्रस्त प्रमाणपत्र, श्रावण बाळ योजना लाभपत्र, कुणबी दाखला, डोमेसाइल प्रमाणपत्र तसेच अग्रीस्टॅक प्रिंट यांचा समावेश होता.

या कार्यक्रमात लाभार्थी



म्हणून देवईबाई भुजंगराव शिंदे, वृंदावणी बंडू जाधव, छायाबाई निवृत्ती रांजवन, हरिबाई श्रीराम रांजवन, सुशीला राजेंद्र रांजवन, जलसाबाई नामदेब रांजवन, देवना बाई चंद्रसेन तावरे, सुशीला विठ्ठल शिंदे, महादेव संजय रोहिटे, निखिल मिठु थोरात, दत्तात्रय बन्सीधर सिंघन, कचरू लहानू गायकवाड, सुशीलाबाई विठ्ठल शिंदे व चंद्रकला त्रिंबक रांजवन यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

यावेळी तहसीलदार शेळके यांनी शासनाच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती शेतकऱ्यांना दिली तसेच त्यांच्या अडी–अडचणी समजून घेत मार्गदर्शन केले. बैठकीच्या शेवटी उपस्थित ग्रामस्थ व पंचक्रोशीतील नागरिकांनी तहसीलदार यांचे आभार मानले. तसेच येथे उपस्थित असलेल्या सर्व ग्रामस्थांमधून या भागामध्ये अतिशय उत्कृष्ट महसूल प्रशासनाचे कर्तव्य बजावत असणाऱ्या शितलताई चाटे यांच्या उत्कृष्ट कार्याच्या बाबतीत देखील तहसीलदार साहेबांना गावकऱ्यांनी सांगितलं की शितलताई चाटे या अतिशय कर्तव्यदक्ष लेडी सिंघम म्हणून सर्वत्र बीड जिल्ह्यामध्ये व महसूल विभागामध्ये मंडळ निरीक्षक म्हणून प्रसिद्ध आहेत त्या आमच्या सर्वांच्या सुखदुःखामध्ये आपल्या आदेशानुसार सातत्याने सहभागी होऊन आमचे अडीअडचणी आपल्यापर्यंत आणून त्या सोडवण्यासाठी त्या प्रयत्नशील असतात म्हणून त्यांच्या महसूल प्रशासकीय कर्तव्याच्या बाबतीत कितीही आम्ही कौतुक केले तरी कमी आहे अशा मंडळ निरीक्षक आमच्या पाली महसूल विभागाला लाभणे म्हणजे आमचे सर्व या भागाच्या शेतकऱ्यांचे परम भाग्य आहे असे देखील आवर्जून सर्व उपस्थित शेतकरी बांधवांनी तहसीलदार शेळके साहेबांच्याकडे मंडळ अधिकारी शितलताई चाटे या पाली महसूल भागामध्ये महसूल करत असलेल्या त्या कर्तव्य बाबतीत समाधान व्यक्त केले.

पान ६ वरुन...

### आ.धस यांच्या अभ्यासु

प्रश्नांची सरबत्ती केल्याने अधिकाऱ्यांची उत्तरे देताना नाकी नऊ आल्याचे चित्र पाहायला मिळाले.या बैठकीत महसूल,महावितरण,पंचायत समिती,शिक्षण, सार्वजनिक बांधकाम,कृषी आदी विभागांचा संक्षिप्त पण ठोस आढावा घेण्यात आला.तहसील कार्यालयात वाढत असलेल्या एजंटगिरीवर आमदार धस यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत नागरिकांची फसवणूक करणाऱ्यांवर थेट फौजदारी कारवाईचे आदेश दिले.शासकीय पोर्टल्स व केवायसीच्या नावाखाली कामे अडवणाऱ्यांना खडसावण्यात आले.पाटोदा शहरातील रोडरोमिओ आणि सायलेन्सर बुलेटमुळे नागरिक त्रस्त असल्याचा मुद्दा उपस्थित करत आमदार धस यांनी पोलिस अधिकाऱ्यांना कडक सूचना दिल्या. सायलेन्सर लावलेल्या बुलेट वापरणाऱ्या तरुणांवर दिसेल त्या ठिकाणी कारवाई करा गाड्या थेट पोलीस ठाण्यात आणा आणि बेकायदेशीर सायलेन्सर काढून त्यावर रोलर फिरवा.शहरात दहशत माजवणाऱ्यांना धडा शिकवा असे स्पष्ट आदेश त्यांनी दिले.एकूणच मागील दहा वर्षांत झालेल्या आढावा बैठकींपेक्षा ही बैठक अधिक आक्रमक, अभ्यासपूर्ण आणि निर्णयक्षम ठरली. प्रशासनावर आमदार सुरेश धस यांची ठाम पकड या बैठकीत स्पष्टपणे दिसून आली असून,काम करा अन्यथा कारवाईला सामोरे जा, हा स्पष्ट संदेश या वादळी बैठकीतून देण्यात आला.

### मुंबईतील आंदोलनात सहभागी

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती शामराव पडुळे, माजी पंचायत समिती सदस्य मोहन देवकते, माजी नगराध्यक्ष, दिलीप गोरे, शांतीलाल पिसाळ, गजानन काळे, सरपंच फारुख शेख, संदीप पाटील, अशोक ढास अजय घोडके, अमर ढोणे, परमेश्वर वाघमोडे, राम महाराज बुधनर यांच्यासह धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ससाणे यांच्या उमेदवारीचा

संवादातून मतदार सौ. ससाणे यांच्याकडे ''निष्कलंक, अभ्यासू आणि काम करणारा चेहरा'' म्हणून पाहत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.महिला सक्षमीकरण, युवकांना रोजगाराच्या संधी, गावपातळीवरील मूलभूत सुविधांचा दर्जा उंचावणे आणि पारदर्शक कारभार ही त्यांच्या प्रचाराची प्रमुख सूत्रे ठरत आहेत. ''सत्ता नव्हे, सेवा हेच ध्येय'' या भूमिकेने त्या मतदारांशी संवाद साधत असून, विकासाच्या ठोस आराखड्यासह त्या निवडणूक रिंगणात उतरल्या आहेत. एकूणच चिंचोली माळी जिल्हा परिषद गटात ''यावेळी कामाचा उमेदवार निवडून येणार'' ही चर्चा दिवसेंदिवस जोर धरत असून, सौ. सरोजनी दादासाहेब ससाणे यांच्या उमेदवारीमुळे येथील राजकीय समीकरणे बदलण्याची स्पष्ट शक्यता निर्माण झाली आहे.

### नवनिर्वाचित नगराध्यक्षा

शिंदे, नितीन काळे, अर्जुन चव्हाण, लक्ष्मण महाडिक यांच्यासह शिवसेना व महिला आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. तसेच महिला आघाडीच्या मनीषा नेमाने, मीरा ननवरे, रूपाली कानतोडे, वैशाली टल्ले, पार्वती पिंपळे, अश्विनी नरके, माया नाईकवाडे, नयना फरताळे, छाया नवले, कोमल नवले, शितल पिंगळे, मीरा पवळ, रेखा परकाळे, तमन्ना सय्यद, करुणा शिंदे, सोनाली नवले, सुनंदा मोरे, रुक्मिणी सुरवसे, रेखा चव्हाण, कविता नवले, सुनीता काळे आदी असंख्य महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या सत्कारप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी सौ. प्रेमलताताई पारवे यांच्या निवडीचे अभिनंदन करत त्यांच्या भावी कार्यास शुभेच्छा दिल्या.

### राजे धर्माजी गडाच्या विकासासाठी

दरेकर (नाना), ह. भ. प. विष्णू महाराज यांच्यासह आदिनाथ सानप, पोपट गर्जे, विठ्ठल गर्जे, अशोक गर्जे, भाऊसाहेब भवर, माऊली जरांगे, युवराज तरटे, धनंजय तरटे, काकासाहेब गर्जे, बाबू गर्जे, इंद्रजीत गर्जे, गर्जे फौजी, अश्रूबा खलाटे, रमेश खलाटे, सारूक मामा, कारभारी गर्जे, दिलीप भराटे, इंद्रजीत गोल्हार, शिवाजी गर्जे, अजिनाथ गर्जे, लोखंडे, बाळासाहेब सकुंडे, सरपंच महाडिक आदी मान्यवर उपस्थित होते.

### हजयात्रेसाठी जाणाऱ्या

मुस्लिम धर्म गुरू मुफ्ती अब्दुल मुखिम साहेब हाजियाना सविस्तर शिकवतात.जिल्हाभरातून मुस्लीम बांधव मोठ्या प्रमाणावर हजयात्रासाठी जातात. हाजी यांच्या सेवेसाठी, हज जाण्याच्या अनुषंगाने सर्व प्रकारचे मार्गदर्शन करण्यासाठी बीड जिल्हा खादीम–उल–हुज्जाज कमिटी मागील तीन वर्षा पासून मार्गदर्शन शिबिर, कार्ये शाळा आयोजित करत आहेत. ज २०२६ साठी जाणाऱ्या सर्व हाजींनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा.अधिक माहितीसाठी बीड जिल्हा खादीम उल हुज्जाज कमिटीच्या अध्यक्ष हाजी बी.एस. मोहसीन यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन बी.एस मोहसीन यांनी केले आहे.

### गंडाळवाडी येथे लग्नाच्या

दाखल करू, अशी धमकी त्यांनी दिली. या धमकीनंतर आपली संघटित टोळीकडून फसवणूक झाल्याची खात्री संजय यांना पटली. संजय पवार यांच्या तक्रारीवरून अंमळनेर पोलिसांनी ५ जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. यामध्ये दत्ता पंढरीनाथ पवार (रा. सुपा, पाटोदा) – पठाण (रा. चोभा निमगाव, आष्टी) – रुपाली बाळू दिशागंज (रा. लाडगाव) – नवरी जयश्री रवी शिंदे (रा. पंढरपूर) – कथित मावशी आणि अनोळखी महिला एजंट या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक भार्गव सपकाळ करत आहेत. लग्नाळू तरुणांनी अशा मध्यस्थांपासून सावध राहावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

## ज्ञानेश्वर मेंडके यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

येथील सामाजिक कार्यकर्ते तथा भाजपा नेते ज्ञानेश्वर मेंडके यांच्या वाढदिवसानिमीत्त बॅनरबाजी वरील अनावश्यक खर्च टाळत विवीध उपक्रम राबवत सामाजिक बांधीलकी जोपासली.

प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीच्या सामाजिक उपक्रमात भारतीय जनता पार्टी माजलगाव यांच्या कडुन गोशाळा देवखेडा ११००० हजार देणगी व बाळासाहेब गायकवाड यांच्या कडून मूकबधिर निवासी विद्यालय माजलगाव येथे विद्यार्थ्यांना भोजनाची व्यवस्था व लक्ष्मण गायकवाड यांच्या कडून पालावरील गोरगरिबांना ब्लँकेट वाटप नंदू भाऊ ऊंड्डे जॅकी इनामदार यांच्या कडून ग्रामीण पोलीस स्टेशन माजलगाव येथे ५१ झाडांचे वृक्षारोप केले सह्याद्री



प्रतिष्ठान कडून मुख बधिर निवासी विद्यालय माजलगाव येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप यावेळी उपस्थित अरुण आबा राऊत शिवाजीराव रांजवन डॉ.अशोक तिडके विनायक रत्नपारखी रूपालीताई कचरे अभिजीत सोळंके अभय भैया होके ईश्वर आप्पा खुर्पे नारायण सोनवणे माजी नगरसेवक आशोक आळने शरद कचरे लक्ष्मण गायकवाड विनोद लड्डा कल्याण शेप सहाजी शहाजी सोळंके विशाल शिंदे संतोष जाधव राम शिंदे पवनजी मोगरेकर कैलास खुर्पे नारायण मेंडके अनिस शेख सिद्धेश्वर राठोड दिलीपराव सोळंके विलास नेमाने अविनाश गायकवाड आकाश पवार जॅकी इनामदार बबनराव सूरवशे बाळासाहेब शिरसागर अजीम पठाण सुभाष कांबळे श्रीपद धिरडे रवी गायकवाड बाळू मेंडके किट्टिआडगाव सर्कल दत्ता जाधव मच्छिंद्र मेंडके सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारतीय जनता पार्टी माजलगाव व स्वराष्ट्र मित्र मंडळ सदस्यांनी परिश्रम घेतले.

## आ.सोळंके यांच्या उपस्थितीत नगराध्यक्ष जाधव यांचा सत्कार

वडवणी । प्रतिनिधी

आमदार प्रकाशदादा सोळंके युवा नेते जयसिंह भैय्या सोळंके यांच्या प्रमुख उपस्थितीत वडवणी शहरात धारूर शहराचे नवनिर्वाचित नगर परिषद नगराध्यक्ष सह नगरसेवक यांचा राजेभाऊ मुंडे व बाबरीशेठ मुंडे यांच्याकडून सत्कारचे आयोजन करण्यात आले होते. धारूर नगरपरिषद निवडनुकीत राष्ट्रवादी अजितदादा पवार यांच्या नेत्वात आमदार प्रकाशदादा सोळंके राजेभाऊ यांच्या मार्गदर्शनाखाली व जयसिंह भैया सोळंके बाबरीशेठे मुंडे यांच्या नियोजनाने धारूर नगर परिषद राषष्ट्रवादीच्या ताब्यात आली आसुन नगराध्यक्ष बालाभाऊ जाधव यांची नगराध्यक्षपदी विजयी झाले.

म्हणून त्याची वडवणी येथील बाबरीशेठ मुंडे यांच्या निवासस्थानी त्यांचा सत्कार करण्यात आला. धारूर नगर परिषद निवडनुकीत मतदाराने स्पष्टपणे सत्ता पालटचा कौल दिला तब्बल पंचेविस वर्षाने भाजपाकडून सत्ता खेचुन घेत आमदार प्रकाशदादा सोळंके व राजेभाऊ मुंडे यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा पवार गट ) यांच्या हाती शहराच्या विकासासाठी सुत्रे दिली. यावेळी बोलतांना आमदार प्रकाश दादा म्हाणाले की वचननामा दिलेल्या प्रमाणे आपण शहरातील



पाणी पुरवठा, स्वच्छता रस्ते ,नाली व ईतर विकासकामे लवकरच मार्गी लावणार आहोत असे या सत्कार प्रसंगी मनोगत व्यक्त केले.त्यानी सांगीतले की नगरध्यक्षानी विकासकामासाठी तत्पर राहावे त्यांनी विकास कामासाठी मी आणी राजेभाऊ मुंडे वेळोवेळी सहकार्य करू यावेळी जयसिह भैया सोळकें वडवणीचे नगराध्यक्ष शेषेराव जगताप, तालूकाध्यक्ष बजरंग साबळे, बाबरीशेठ मुंडे धारुर तालुकाध्यक्ष सह वडवणीती नगरसेवक व राष्ट्रवादीचे कार्यकर्ते मोठ्या उपस्थीत होते .

## महापुरुषांना वंदन करून नगराध्यक्षांसह सर्व नगरसेवक गोपीनाथगडावर नतमस्तक

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी वैजनाथ नगरपरिषद निवडणुकीत ऐतिहासिक विजय प्राप्त झाल्यानंतर महायुतीच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व महायुतीच्या सर्व विजयी नगरसेवक यांनी आज एकत्रितपणे परळी शहरातील महापुरुषांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून वंदन केले. त्याचप्रमाणे महायुतीचे श्रद्धास्थान असलेल्या लोकनेते गोपीनाथराव मुंडे व स्व. पंडितअण्णा मुंडे यांच्या समाधीस्थळी जाऊन अभिवादन केले.

परळी वैजनाथ नगरपरिषद निवडणुकीमध्ये ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस, भाजपा, शिवसेना, रिपाई व मित्रपक्ष महायुतीच्या वतीने घवघवीत यश संपादन केले आहे.



या निवडणुकीत सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी या जनतेतून नगराध्यक्ष म्हणून १५६६२ इतक्या प्रचंड मताधिक्याने विजय झालेल्या आहेत. त्याचबरोबर सर्व नगरसेवकही प्रचंड मताधिक्याने विजयी झाले आहेत. परळी वैजनाथ नगर परिषदेची ही ऐतिहासिक विजयाची नांदी असून हा ऐतिहासिक विजय महापुरुषांच्या व आपल्या श्रद्धास्थानाच्या चरणी आज नतमस्तक होऊन अर्पण करण्यात आला. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून नवनिर्वाचित नगराध्यक्षा व सर्व नगरसेवकांनी वंदन केले. त्याचप्रमाणे दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे समाधीस्थळ असलेल्या गोपीनाथ गडावर जाऊन या ठिकाणी समाधी स्थळाचे दर्शन घेतले. त्याचबरोबर स्व. पंडितअण्णा मुंडे यांच्या समाधीस्थळीही पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी,माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष तथा नगरसेवक वैजनाथ सोळंके, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष आयुबखान पठाण, निळकंठ चाटे,नगरसेवक सौ.जयश्रीताई मोगरकर, राजाखान पठाण, प्रा. पवन मुंडे, जयपाल लाहोटी, डॉ. पूजा तोतला, अंजली माळी, वंदना आघाव, रूपाली पवार,दीपक मुंडे, अश्विनकुमार आघाव,अनंत इंगळे, महादेव रोडे, सचिन सारडा, योगेश मेनकुदळे, जयराज देशमुख,भीमराव डावरे, कार्तिक कांबळे, रमेश पवार, हाजी बाबू, शेख अल्ताफ,अश्विन मोगरकर, प्रीतेश तोतला, सचिन आरसुडे,भागवत गित्ते, अशोक पवार, एजाज शेख यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जाहिर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ७६६/२०२५**

**अंकुश अर्जूनराव कोटुळे विरुद्ध**

**ग्रामपंचायत कार्यालय वरवटी/आहेर धानोरा**

पहा

१.अंकुश अर्जूनराव कोटुळे रा.वरवटी ता.जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्मधारक शितल अंकुश कोटुळे यांचा दिनांक ०५/०६/२००७ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालय वरवटी/आहेर धानोरा ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे वरवटी/आहेर धानोरा ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक २२/१२/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १८/०१/२०२६ ही आहे

**स्वाक्षरीत**

**तहसिलदार, बीड**

cmyk

राज्य लोकतंत्र

शेत-शिवार

शुक्रवार दि. २६ डिसेंबर २०२५



# एमएसपी वरील कापूस खरेदी ६० टक्क्यांनी वाढली; सीसीआयकडून ५० लाख गाठी खरेदी

पुणे : कमीभावावरून केलेल्या कापूस खरेदीत यंदा प्रचंड वाढ झाली आहे. मागील वर्षीपेक्षा यंदा तब्बल ६० टक्क्यांनी कापूस खरेदी वाढली आहे. कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (सीसीआय) ने चालू २०२५-२६ हंगामात आतापर्यंत किमान आधारभूत किमतीवर सुमारे ५० लाख गाठी कापसाची खरेदी केली आहे. गेल्या वर्षी डिसेंबरच्या मध्यात ३.१ दशलक्ष गाठीं खरेदी झाल्या होत्या. त्यातुलनेत हा आकडा जास्त आहे.

सीसीआयचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक ललित कुमार गुप्ता यांनी याबाबत माहिती देत म्हटले की, ११.८ दशलक्ष गाठींच्या आवकांपैकी आम्ही अंदाजे ५० लाख गाठी खरेदी केल्या आहेत. दररोजची खरेदी आता २००,००० गाठींपेक्षा जास्त झाली आहे. सीसीआयच्या मते, १९ डिसेंबरपर्यंत कच्च्या कापसाची एकूण खरेदी २३०.२३ लाख क्विंटल होती, ज्याची किंमत १८,२३८ कोटी रुपये आहे. यातील बहुतेक खरेदी तेलंगणा आणि महाराष्ट्रात झाली. तेलंगणामध्ये अंदाजे ९३.८७ लाख क्विंटल कापूस खरेदी करण्यात



आला आहे, ज्याची किंमत ७,४४५ कोटी आहे, तर महाराष्ट्रात सीसीआयने अंदाजे ४७.६९ लाख क्विंटल कापूस खरेदी केला आहे, ज्याची किंमत ३,७७९ कोटी रुपये आहे.

विविध राज्यांमधील खरेदी : कर्नाटकमध्ये सीसीआयने १,७०८ कोटींचा २१.४९ लाख क्विंटल कापूस खरेदी केला, गुजरातमध्ये १,५४६ कोटींचा १९.२३ लाख क्विंटल कापूस खरेदी केला. आंध्र प्रदेशात खरेदी केलेले प्रमाण ९७२ कोटी आहे, तर राजस्थानमध्ये आतापर्यंत ८४८ कोटी रुपयांच्या कापसाची खरेदी झाली आहे.

सीसीआयच्या वेबसाइटवरील आकडेवारीनुसार, हरियाणामध्ये ४८४ कोटी, ओडिशामध्ये ३१५ कोटी आणि पंजाबमध्ये १०३ कोटींचा कापूस खरेदी केला आहे.

खरे तर केंद्र सरकारने २०२५-२६ हंगामासाठी मध्यम-मुख्य कापसासाठी ७,७१० रुपये प्रति क्विंटल आणि लांब-मुख्य कापसासाठी ८,११० रुपये प्रति क्विंटल किमान आधारभूत किमतीची घोषणा केली आहे. मात्र बाजारपेठेत अजूनही यापेक्षा कमी किमतीत शेतकऱ्याला कापूस विकावा लागत आहे. कमी क्षेत्रफळ आणि खराब हवामानामुळे या वर्षी कापसाचे उत्पादन कमी झाले आहे. तसेच अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे जवळजवळ सर्व कापूस उत्पादक राज्यांमध्ये गुणवत्तेवर परिणाम झाल्याचे पाहायला मिळाले.

## शेतकऱ्यांनो, घरबसल्या मिळवा २ लाखांचे कर्ज

### सरकारने सुरु केले खास पोर्टल



पुणे :शेतकरी मित्रानो, आता तुम्ही घरबसल्या पीक कर्जासाठी अर्ज करू शकता आणि या अर्जाच्या माध्यमातून तब्बल २ लाखांपर्यंत कर्ज मिळवू शकता. होय, राष्ट्रीयीकृत बँकांकडून पीक कर्जासाठी आता ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा शेतकऱ्यांना उपलब्ध करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळण्याची प्रक्रिया अधिक सुलभ व पारदर्शक करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी केंद्र सरकार कडून की खास पोर्टल लाँच करण्यात आले आहे.

हे आहे पोर्टलचे नाव : क्षरपीरारींह ीींरिश्र असे या पोर्टलचे नाव आहे. या पोर्टलच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आता घरबसल्या पीक कर्जासाठी अर्ज करता येणार आहे. या अर्जानंतर किसान क्रेडिट कार्डद्वारे दोन लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज मिळू शकणार आहे. शासनाने पायलट प्रोजेक्ट म्हणून महाराष्ट्रातून फक्त सोलापूर जिल्ह्याची निवड केली असून, आता लवकरच याची व्याप्ती वाढणार आहे.

या कागदपत्रांची आवश्यकता

शेतकरी आयडी, आधारकार्ड, मोबाईल नंबर, बँक पासबुक, पॅनकार्ड.

हो होणार फायदा : दोन लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज मिळू शकणार. शेतकऱ्यांना कर्जासाठी सतत बँकांच्या चकरा मारण्याची गरज भासणार नाही. कमीत कमी कालावधीत कर्ज मंजूर होण्यास मदत होईल. महत्वाची बाब म्हणजे या ऑनलाइन प्रकियेकरिता कोणतेही शासकीय शुल्क आकारले जाणार नाही. या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा व तालुकास्तरावर विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेचे वेळापत्रक तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी, जिल्हा अग्रणी बँक तालुका प्रतिनिधी यांच्या समन्वयाने तयार करण्यात येईल. सदर अर्ज प्रकियेत सेतू केंद्र, महा ई-सेवा, ग्राहक सेवा केंद्र यांचाही सहभाग घेण्यात येईल.

## जमिनीच्या गुणधर्मानुसार वापरा रासायनिक खते

जमिनीच्या पोतानुसार आणि प्रकारानुसार रासायनिक खतांची निवड करणे उत्पादकता वाढविण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असते. रासायनिक खतांसोबत शेणखत किंवा गांडूळ खताचा वापर केल्यास जमिनीचा पोत सुधारतो, जमिनीची सुपीकता टिकून राहते आणि रासायनिक खतांची कार्यक्षमता वाढते. जमिनीचा सामू अन्नद्रव्यांच्या उपलब्धतेच्या दृष्टीने फार महत्त्वाचा असतो. जमिनीचा सामू ६.५ पेक्षा कमी असल्यास जमीन आम्लधर्मी आणि ७.५ पेक्षा जास्त असल्यास ती जमीन विम्लधर्मी किंवा अल्कधर्मी मानली जाते. अशा जमिनीत पिकांना अन्नद्रव्यांची उपलब्धता कमी होते, विशेषतः स्फुरद आणि लोह, जस्त यांसारखी सूक्ष्म अन्नद्रव्ये पिकांना सहजासहजी मिळत नाहीत. अशा अल्कधर्मी जमिनीसाठी जमिनीत आम्लधर्मी प्रकारची खते आणि भूसुधारक वापरणे फायदेशीर ठरते. ही खते जमिनीचा सामू कमी करण्यास मदत करतात आणि लोह, फॉस्फरस आणि झिंकसारख्या स्थिर अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढवतात. ज्या खतांमुळे जमिनीचा सामू कमी होण्यास मदत होते, अशी खते वापरावीत.



अमोनिअम सल्फेट : नत्र पुरविण्यासाठी हे उत्तम खत आहे कारण याचा स्वभाव आम्लयुक्त असतो. हे सर्वांत प्रभावी आम्लयुक्त परिणाम देणारे खत आहे. हे जमिनीत मिसळल्यावर हायड्रोजन आयन मुक्त करते, ज्यामुळे सामू कमी होतो. अमोनिअम नायट्रेट : हे आम्लयुक्त खत आहे. ठिबक सिंचनाद्वारे याचा वापर केल्यास ते जमिनीचा अल्कधर्मीपणा कमी करते. एक आम्लीय स्रोत जमिनीत मिसळल्यावर तत्काळ आणि दीर्घकालीन नायट्रोजन पुरवतो. सिंगल सुपर फॉस्फेट : मातीमध्ये फॉस्फरस अनेकदा स्थिर होतो, वनस्पतींसाठी उपलब्ध राहत नाही. सिंगल सुपर फॉस्फेटमध्ये गंधकाचे प्रमाण असल्याने ते अल्कधर्मी जमिनीसाठी उत्तम आहे. मोनो-अमोनिअम फॉस्फेट : हे डीएपी पेक्षा जास्त आम्लयुक्त असते, त्यामुळे ७.५ पेक्षा जास्त सामू असलेल्या जमिनीत अधिक उपयुक्त ठरते. फॉस्फेरिक ॲसिड : ठिबक सिंचनाद्वारे याचा वापर केल्यास मातीतील क्षारियता थेट कमी करता येते, कारण जमिनीचा अल्कधर्मीपणा थेट कमी करते आणि स्फुरद उपलब्ध करून देते. पोटॅशिअम सल्फेट : अल्कधर्मी जमिनीत म्युरेट ऑफ पोटॅशऐवजी पोटॅशिअम सल्फेट वापरणे चांगले असते, कारण त्यातील सल्फेट मुळांच्या कार्यक्षेत्रातील सामू कमी करण्यास मदत करते. गंधक : सामू ८.५ पेक्षा कमी असल्यास गंधकाचा वापर शेणखतात मिसळून करावा. गंधकामुळे जमिनीचा सामू हळूहळू कमी होतो. जिप्सम : जर जमिनीत चुनखडीचे प्रमाण कमी असेल आणि सामू जास्त असेल, तर जिप्समचा वापर जमिनीच्या सुधारणेसाठी केला जातो. पोषक तत्त्वांची उपलब्धता वाढणे : अल्कधर्मी जमिनीत स्फुरद आणि लोह हे घटक स्थिर होतात, म्हणजेच पिकांना मिळत नाहीत. आम्लयुक्त खतांच्या अभिक्रियेमुळे तयार होणाऱ्या स्थानिक आम्लतेमुळे जमिनीतील अघुलनशील पोषक तत्त्वे विरघळतात आणि पिकांना सहज उपलब्ध होतात. आम्लयुक्त खते हायड्रोजन आयन सोडतात, जे जमिनीतील अल्कली (क्षार) उदासीन करतात आणि मातीचा सामू पिकांसाठी पोषक बनवतात. माती परीक्षणानुसार वापर : रासायनिक खतांचा वापर माती परीक्षणानुसार करावा. खते टाकण्यापूर्वी माती परीक्षण करून नेमक्या कोणत्या अन्नद्रव्याची कमतरता आहे हे तपासावे. सेंद्रिय खतांचा आधार : रासायनिक खतांसोबत शेणखत किंवा गांडूळ खताचा वापर केल्यास जमिनीचा पोत सुधारतो, जमिनीची सुपीकता टिकून राहते आणि रासायनिक खतांची कार्यक्षमता वाढते. काळी जमीन : यामध्ये स्फुरद आणि पालाश मध्यम प्रमाणात असते, पण नत्राची कमतरता असते. यामध्ये चुनखडीचे प्रमाण जास्त असू शकते. अमोनिअम सल्फेट आणि नत्र-स्फुरद-पालाशयुक्त संयुक्त खते वापरावीत. सिंगल सुपर फॉस्फेट वापरणे अधिक फायदेशीर ठरते. लाल किंवा हलकी जमीन : अशा जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी असते आणि अन्नद्रव्ये लवकर वाहून जातात. यामध्ये नत्र, स्फुरद आणि सेंद्रिय कर्बाचे प्रमाण कमी असते. नत्रयुक्त खतांच्या (युरिया) मात्रा विभागून द्याव्यात जेणेकरून नत्र वाहून जाणार नाही. स्फुरदासाठी सिंगल सुपर फॉस्फेटचा वापर करावा. या जमिनीत नत्र-स्फुरद-पालाशयुक्त संयुक्त खते वापरणे योग्य ठरते.


क्षारयुक्त किंवा अल्कधर्मी जमीन : या जमिनीचा सामू ७.५ पेक्षा जास्त असतो, जिथे लोह आणि जस्ताची कमतरता जाणवते. आम्लयुक्त खतांचा वापर करावा. अमोनिअम सल्फेट हे नत्राचा सर्वोत्तम स्रोत आहे. स्फुरदासाठी सिंगल सुपर फॉस्फेटला प्राधान्य द्यावे, कारण त्यात गंधक असते. गाळाची किंवा मध्यम जमीन : ही जमीन सुपीक असून सर्वसाधारणपणे सर्व पिकांसाठी योग्य असते. पिकाच्या गरजेनुसार संतुलित खतांचा वापर करावा. तृणधान्यांसाठी (गहू, भात) नत्रयुक्त, तर कडधान्यांसाठी स्फुरदयुक्त खतांची निवड करावी. लॅटराईट किंवा जांभा जमीन : ही जमीन कोकण भागात प्रामुख्याने आढळते. ही जमीन निसर्गतः आम्लधर्मी येथे विद्राव्य फॉस्फेट लवकर स्थिर होते, म्हणून रॉक फॉस्फेट किंवा बोनमिल सारख्या मंद गतीने विरघळणाऱ्या खतांचा वापर करावा.

## सेंद्रीय कीटकनाशक दशपर्णी अर्क तयार करण्याची पद्धत

पिकांची पेरणी/ लागवड झालेली आहे. सुरुवातीच्या काळात पिकांवर रसशोषक किडी आणि काही अळ्यांचा प्रादुर्भाव दिसून येतो. यावेळी सेंद्रिय कीटकनाशकाचा वापर करून या किडींचे योग्य व्यवस्थापन करता येते. यामुळे पिकांचे सुद्धा नुकसान होत नाही. सेंद्रिय शेतीमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे अर्क तयार केले जातात. त्यापैकीच एक म्हणजे दशपर्णी अर्क होय. दशपर्णी अर्क हा अत्यंत बहुगुणी आणि बहुउपयोगी अर्क आहे. नावाप्रमाणेच या अर्कात १० वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पतीचा उपयोग केला जातो. वेगवेगळ्या उग्र वासाच्या वनस्पतीचा पाला यात वापरला जातो. दशपर्णी अर्क हे नैसर्गिक किटकनाशक असून हे शेतकऱ्यांसाठी खूप फायदेशीर आहे व शेतीचा खर्च यामुळे नक्कीच कमी होवू शकतो.

दशपर्णी अर्कासाठी वनस्पतीचा वापर :कडुनिंब पाला ५ किलो, एरंडपाला २ किलो, गुळवेलपाला २ किलो, घाणेरीपाला २ किलो, पपईचा पाला २ किलो, सिताफळाचा पाला २ किलो, रूईचा पाला २ किलो, पांढरा धोतरा २ किलो, करंजपाला २ किलो, लाल कन्हेरपाला २ किलो, झेंडू पाने, निरगुडी, बेशरम, पेरू इत्यादी २ किलो.

इतर साहित्य :प्लास्टीक टाकी २०० लिटर, देशी गायीचे शेण ३ किलो, देशी गायीचे गोमूत्र ५ लिटर, हिरवी मिरची ठेचा २ किलो, लसुण ठेचा पाव किलो, वरीलपैकी कोणत्याही १० वनस्पतीचा



पाला घ्यावा. एखाद दुसरी वनस्पती उपलब्ध नसल्यास इतर कोणत्याही उग्र वनस्पतीचा पाला चालू शकतो. शक्यतो देशी गायीचे शेण ताजे घ्यावे, सुकलेले वापरू नये. गोमूत्र जितके जुने तेवढा त्याचा औषधी गुणधर्म जास्त असतो.

दशपर्णी अर्क तयार करण्याची पद्धत : यापैकी करंज, रूई, सिताफळाचा पाला, कडुनिंबाचा पाला, महत्त्वाचा बाकीचे सर्व उपलब्ध असतील त्यानुसार घेणे सर्व मिळून १० वनस्पती होणे गरजेचे आहे. वरील सर्व वनस्पती बारीक करून घेणे तसेच तिखट हिरवी मिरचीचा ठेचा, लसूण ठेचा, देशी गायीचे शेण व गोमूत्र हे सर्व मिश्रण २०० लिटर क्षमता असलेल्या पाण्याच्या ड्रममध्ये सडविण्यासाठी सावलीत ठेवून ते गोणपाटाने झाकून ठेवावे. दिवसातून कमीत कमी २ वेळा हे मिश्रण काठीने ढवळावे व पुन्हा गोणपाटाने झाकून ठेवून असे मिश्रण १ महिनाभर ठेवल्यानंतर त्याला उग्र वास येतो त्यानंतर हे मिश्रण सुती कापडाने गाळून घ्यावे. दशपर्णी अर्क तयार करताना तो सावलीच्या जागी करावा. दशपर्णी अर्क तयार झाल्यानंतर वस्त्रगाळ करण्यासाठी सुती कापडाचा वापर करावा.

दशपर्णी अर्काचा वापर : दशपर्णी अर्क तयार केल्यापासून ३ महिन्याच्या आत वापरता येते. मात्र अर्क बंद झाकणाच्या कॅनमध्ये व्यवस्थित ठेवलेला असावा. दशपर्णी हा तयार झालेला अर्क कीड नियंत्रणासाठी १६ लिटर पाण्यात २०० मिली दशपर्णी अर्क फवारणीसाठी वापर करावा. फवारणी शक्यतो सकाळी किंवा सायंकाळी करावी.

दशपर्णी अर्काचे फायदे : दशपर्णी अर्काच्या फवारणीमुळे मित्र किडीचे संवर्धन होऊन नैसर्गिक पद्धतीने कीड नियंत्रण होते. उग्र वासामुळे किडी पिकांमध्ये अंडी देण्यापासून परावृत्त होतात. रासायनिक किटकनाशकाचा वापर कमी झाल्याने पिकांवर किडनाशकांचे अंश राहत नाहीत. अर्क फवारणीमुळे लहान अळ्या, रसशोषक किडी व किडींची अंडी अवस्थेचे निर्मूलन होते. पर्यावरणपूरक कीड नियंत्रण झाल्याने सकस व विषमुक्त भाजीपाला उत्पादित होतो व शेती मालास सेंद्रिय म्हणून उत्तम दरही मिळतो. दशपर्णी अर्क तुडतुडे, मावा, फुलकिडे, पहिल्या २ अवस्थेतील अळ्या यांच्यावर प्रभावी काम करते याची फवारणी शक्यतो दर ८ दिवसाला करावी.




### महत्वाच्या घटना

१८९५ : लुईस आणि ऑगस्ट लुइम यांनी तिकीट विक्री करून पहिल्या चित्रपटाचा पहिला शो पॅरिस येथे प्रदर्शित केला.
१८९८ : मेरी क्यूरी आणि पिअर क्यूरी यांनी प्रथमच रेडिअम हे मूलद्रव्य वेगळे केले.
१९०४ : दिल्ली ते मुंबई पहिली क्रॉस कंट्री मोटारकार रॅलीचे उद्‌घाटन
१९७५ : मॅक २ पेक्षा जोरात उडणारे जगातील पहिले व्यावसायिक सुपरसॉनिक टु १४४ विमानसेवा सुरू झाली.
१९७६ : कम्यूनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ (मार्क्सिस्ट-लेनिनिस्ट) ची स्थापना.
१९७८ : भारताच्या माजी प्रधानमंत्रीइंदिरा गांधीयांची जेल मधून सुटका करण्यात आली.
१९८२ : टाइम मासिकातर्फे दिला जाणारा 'मॅन ऑफ द इयर' पुरस्कार प्रथमच पर्सनल कॉम्प्युटर या एका अमानवी वस्तूस देण्यात आला.
१९९१ : सोव्हिएत युनियन औपचारिकरित्या बरखास्त करण्यात आले.
१९९७ : विंदा करंदीकर यांना महाराष्ट्र फांऊडेशन पुरस्कार
२००४ : ९.३ रिश्टर तीव्रतेच्या एका भूकंपाने एक प्रचंड त्सूनामी लाट निर्माण झाली. या लाटेने भारत, श्रीलंका, इंडोनेशिया, थायलँड, मलेशिया, मालदीव आणि इतर अनेक देशात हाहा:कार माजवला. यात सुमारे २,३०,००० लोक मृत्युमुखी पड्ले. त्यात एका धावत्या रेल्वेगाडीतील १७०० जणांचाही समावेश होता.
२००६ : शेन वार्न ने आंतराष्ट्रीय कसोटीक्रिकेटमध्ये ७०० विकेट घेऊन एक नवीन विक्रम रचला.
२०१२ : चीनची राजधानी बीजिंग पासून तर ग्वांग्झू पर्यंत पहिल्यांदा जगातील सर्वात लांब आणि वेगवान रेल्वे रस्ता सुरु केल्या गेला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७१६ : १८ व्या शतकातील प्रसिद्ध इंग्रजी कवी थॉमस ग्रे यांचा जन्म.
१७८५ : बेल्जियमचे पहिले पंतप्रधान एटिनी कॉन्स्टन्टाईन डी गर्लचा यांचा जन्म. (मृत्यू: १० फेब्रुवारी १८७१)
१७९१ : चार्ल्स बॅबेज - इंग्लिश गणितज्ञ, संशोधक, अभियंता आणि तत्त्वज्ञ, पहिल्या यांत्रिकी संगणकाचा जनक (मृत्यू: १८ आक्टोबर १८७१)
१८९३ : माओ त्से तुंग - आधुनिक चीनचे शिल्पकार, मुत्सद्दी, मार्क्सवादी-लेनिनवादी विचारसरणीचे पुरस्कर्ते (मृत्यू: ९ सप्टेंबर १९७६)
१८९९ : भारताचे स्वातंत्र्य सैनिक ज्यांनी जनरल डायर वर गोळ्या झाडून जालियानवाला बाग हत्याकांडा चा बदला घेतला अश्या सरदार उधम सिंग यांचा आजच्या दिवशी जन्म.
१९१४ : डॉ. मुरलीधर देविदास ऊर्फ बाबा आमटे - कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनासाठी आयुष्य वाहून घेणारे थोर समाजसेवक (मृत्यू: ९ फेब्रुवारी २००८)
१९१४ : डॉ. सुशीला नायर - स्वतंत्र भारताच्या पहिल्या आरोग्यमंत्री, महात्मा गांधींच्या स्वीय सहाय्यिका व डॉक्टर, गांधीवादी कार्यकर्त्या. त्यांनी सेवाग्राम येथे स्थापन केलेल्या एका छोट्या दवाखान्याचे आता 'महात्मा गांधी इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस' या मोठ्या संस्थेत रुपांतर झाले आहे. (मृत्यू: ३ जानेवारी २०००)
१९१७ : डॉ. प्रभाकर माचवे - साहित्यिक. त्यांनी हिंदी, मराठी व इंग्रजीत शंभराहून अधिक ग्रंथ लिहिले. त्यांच्या साहित्यामध्ये स्वप्नभंग, अनुक्षण, मेपल हे काव्यसंग्रह; एक तारा, दर्दके पाबंद इ. कादंबर्या; नाट्यचर्चा, समीक्षा की समीक्षा आदींचा समावेश आहे.
१९२५ : पं. कृष्णा गुंडोपंत तथा 'के. जी.' गिंडे - शास्त्रीय गायक, संगीतकार व शिक्षक (मृत्यू: १३ जुलै १९९४)
१९२९ : गुजराती साहित्यिक तारक मेहता यांचा जन्म.
१९३५ : डॉ. मेबल आरोळे - रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेत्या बहुउद्देशीय ग्रामीण आरोग्य प्रकल्पाच्या संचालिका (मृत्यू: २७ डिसेंबर १९९९)
१९४१ : लालन सारंग - रंगभूमीवरील कलाकार
१९४८ : डॉ. प्रकाश आमटे.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५३० : बाबर - पहिला मुघल सम्राट, हिन्दुस्थानातील मुघल सत्तेचा संस्थापक (जन्म: १४ फेब्रुवारी १४८३)
१९६१ : भारताचे प्रसिद्ध स्वातंत्र्य सैनिक तसेच लेखक भूपेंद्रनाथ दत्त यांचे निधन.
१९६६ : पंजाब चे पहिले मुख्यमंत्री तसेच गांधी स्मारक निधी चे पहिले अध्यक्ष गोपी चंद भार्गव यांचे निधन.
१९७२ : हॅरी एस. ट्रूमन - अमेरिकेचे ३३ वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: ८ मे १८८४)
१९८९ : केशवा तथा के. शंकर पिळ्ळे - व्यंगचित्रकार व लेखक, भारतातील राजकीय व्यंगचित्रांचे जनक, पद्मविभूषण (१९७६), 'चिल्ड्रन्स बुक ट्रस्ट' आणि 'शंकर्स इंटरनॅशनल डॉल्स म्युझियम' यांचे संस्थापक (जन्म: ३१ जुलै १९०२ कायमकुलम, केरळ)
१९९९ : शंकरदयाळ शर्मा - भारताचे ९ वे राष्ट्रपती व ८ वे उपराष्ट्रपती (जन्म: १९ ऑगस्ट १९१८)
२००० : प्रा. शंकर गोविंद साठे - नाटककार आणि साहित्यिक.
२००६ : कृष्णचंद्र मोरेश्वर तथा दाजी भाटवडेकर - अभिनेते (जन्म: १९२१)
२०११ : कर्नाटकचे १५ वे मुख्यमंत्री सरेकोपा बंगारप्पा यांचे निधन. (जन्म: २६ ऑक्टोबर १९३३).

cmyk

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
शुक्रवार दि. २६ डिसेंबर २०२५ ५

# हिंगोलीत स्वच्छ व सुंदर शहर संकल्पना राबविणार

## नवनिर्वाचित नगराध्यक्ष रेखा बांगर यांचा संकल्प; हिंगोली पालिकेचा पदभार स्वीकारला



हिंगोली। प्रतिनिधी

हिंगोली शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्राधान्य दिले जाणार असून, हिंगोली शहर स्वच्छ व सुंदर शहर ही संकल्पना राबविली जाणार असल्याची माहिती नगराध्यक्ष रेखा श्रीराम बांगर यांनी गुरुवारी ता २५ दिली. हिंगोली पालिकेच्या नगराध्यक्षपदाचा पदभार त्यांनी आज स्वीकारला. यावेळी आमदार संतोष बांगर, ॲड मनीष साकळे, युवा सेना जिल्हाप्रमुख राम कदम, नगरसेवक श्रीराम बांगर, ॲड अविनाश बांगर, अनिल नैनवाणी यांच्यासह शिंदेसेनेचे नगरसेवक, पालिका मुख्याधिकारी अरविंद मुंडे, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी नगराध्यक्षा बांगर व नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला

यावेळी हिंगोली पालिकेचा पदभार घेतल्यानंतर बोलताना नगराध्यक्ष रेखा बांगर म्हणाल्या की, आमदार संतोष बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली हिंगोली शहराच्या विकासासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. हिंगोली शहरातील पाणी प्रश्न महत्त्वाचा असून सर्व प्रभागांना नियमितपणे पाणीपुरवठा होण्यासाठी योग्य नियोजन केले जाईल. त्यासाठी वेळप्रसंगी नवीन जलकुंभ उभारणीचे काम हाती घेतली जाईल. तसेच नवीन वसाहतीमध्ये जलवाहिन्या टाकल्या जातील. यातून नवीन वसाहतीला पाणीपुरवठा केला जाणार आहे. याशिवाय शहरातील कचऱ्याचा प्रश्न गंभीर आहे सर्व प्रभागातील ओला व सुका कचरा घंटागाड्यांच्या माध्यमातून एकत्रित करून डम्पिंग ग्राउंड वर कचऱ्यावर प्रक्रिया करून खत निर्मिती केली जाणार आहे. या खताचा वापर शहरातील नवीन वसाहती मोकळे मैदान या ठिकाणी लावल्या जाणाऱ्या झाडांसाठी केला जाणार आहे. शहरातील भूमिगत गटार योजनेच्या माध्यमातून सांडपाणी व्यवस्थापन केले जाणार आहे. त्यामुळे पावसाळ्यात नाल्या तुंबण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही. शहरातील सर्व प्रभागांमध्ये रस्ते, पिण्याचे पाण्याची व्यवस्था, पथदिवे यासह मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व नगरसेवक व पालिका अधिकारी कर्मचाऱ्यांच्या पुढाकारातून प्रयत्न केले जाणार आहे. नागरिकांनीही त्यांचे प्रश्न पालिका प्रशासनाकडे कळविल्यानंतर तातडीने या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी स्वतंत्र कक्ष उभारण्याचे प्रयत्न आहेत. हिंगोली शहर स्वच्छ व सुंदर शहर ही संकल्पना आगामी काळात राबविली जाणार असून या संकल्पनेसाठी नागरिकांनीही सहकार्य करण्याचे आवाहन नगराध्यक्षा बांगर यांनी केले.

## जाफराबाद येथे नाफेडच्या खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांची लूट



जालना। प्रतिनिधी

जाफराबाद, तालुक्यातील नाफेडच्या हमीभाव खरेदी केंद्रावर सोयाबीन व मका विक्रीसाठी आणलेल्या शेतकऱ्यांची आर्थिक लूट सुरू असल्याचा गंभीर प्रकार उपडकीस आला आहे. 'चाळणी आणि गाळणी च्या नावाखाली नाफड खरेदी केंद्र चालकांकडून शेतकऱ्यांकडून सक्तीची वसुली केली जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी भारतीय राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन महासंघ (नाफेड) मार्फत खरेदी केंद्र सुरू करण्यात आले असून, या केंद्रांवर दररोज सुमारे एक हजार किंटल सोयाबीनची खरेदी केली जाते. मात्र, काही फार्मर्स प्रोडयूसर कंपनी लिमिटेडच्या खरेदी केंद्रावर सोयाबीन स्वच्छ करणे, चाळणे व वजनाच्या नावाखाली प्रत्येक शेतकऱ्याकडून प्रति किंटल १५० रुपयांची सक्तीची वसुली केली जात आहे. तसेच 'गट्टी' म्हणून प्रती किंटल दोन किलो सोयाबीन कपात केली जात असल्याचाही आरोप शेतकयांनी केला आहे. एका शेतकऱ्याकडे साधारणतः १० ते १५ किंटल सोयाबीन असते. या हिशोबाने प्रत्येक शेतकऱ्याची हजारो रुपयांची तर एकूण शेतकऱ्यांची लाखो रुपयांची लूट होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. हमीभावाच्या नावाखाली शेतकऱ्यांना दिलासा देण्पाऐवजी त्यांची आर्थिक पिळवणूक होत असल्याने संतप्त शेतकऱ्याऱ्यांनी संबंधित यंत्रणेकडे, तात्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

## अहिल्यानगर-पुणे रस्त्यावरील केडगाव शिवारात तरूणावर चाकूने हल्ला

अहिल्यानगर। प्रतिनिधी

अहिल्यानगर-पुणे रस्त्यावरील केडगाव शिवारात हॉटेल आण्णा तंदुरी धाब्याच्या पाठीमागे जुन्या वादाच्या रागातून एका तरूणावर चाकूने हल्ला केल्याची घटना घडली आहे. आकाश सोनबा धोत्रे (वय २६, रा. अंबिकानगर, केडगाव) असे जखमी तरूणाचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात दोघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ऋतिक भास्कर धोत्रे व रोहित भास्कर धोत्रे (दोघे रा. वडार गल्ली, केडगाव) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. फिर्यादी आकाश धोत्रे हे २० डिसेंबर रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास लघुशंकेसाठी हॉटेलच्या पाठीमागे गेले असता तेथे संशयित आरोपी रोहित धोत्रे व ऋतिक धोत्रे यांनी संगनमत करून त्यांच्यावर हल्ला केला.

मागील भांडणाचा राग मनात धरून संशयित आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ केली.यावेळी रोहित धोत्रे याने फिर्यादीला कानाखाली मारहाण केली. मला का मारले? असे विचारताच आरोपी अधिकच चिडले. त्यानंतर रोहित याने फिर्यादीचे हात पकडले असताना ऋतिक याने हातातील चाकूने फिर्यादीच्या पोटाजवळ बरगडीवर वार करून जखमी केले. जखमी फिर्यादीस उपचारासाठी येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. उपचारानंतर आकाश यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात २३ डिसेंबर रोजी फिर्याद दिली आहे. पोलीस अंमलदार गाजरे अधिक तपास करीत आहेत.

## घटस्फोटीत महिलेच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेऊन अत्याचार

### नांदेडच्या एका तरुणावर सेनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

हिंगोली। प्रतिनिधी

सेनगाव पोलिस ठाण्यांतर्गत एका गावात घटस्फोटीत महिलेच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेत लग्नाचे अमिष दाखवून अत्याचार केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी सेनगाव पोलिस ठाण्यात बुधवारी ता. २४ रात्री गुन्हा दाखल झाला आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांचे एक पथक आरोपीच्या अटकेसाठी रवाना करण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नांदेड येथील राजेश बाबुराव वाघमारे उर्फ मोरे हा सुमारे दिड वर्षापुर्वीपासून सेनगाव तालुक्यात एका फायनांन्स कंपनीमध्ये काम करीत होता. यावेळी वसूली व इतर कारणावरून त्याचे बाहेरगावी दौरे होत होते. यामध्ये त्यांचे एका घटस्फोटीत महिलेसोबत सुत जुळविले. त्याने महिलेच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेत तिच्याशी वारंवार संवाद साधण्यास सुरवात केली.

त्यानंतर त्याने महिलेस लग्नाचे अमिष दाखविले. तुझ्या सोबत लग्न करतो तसेच तुझ्या मुलाचा सांभाळ करतो असे म्हणत ता. १३ जानेवारी २५ ते ता. १९ सप्टेंबर पर्यंत तिला सेनगाव, नांदेड, वाशीम येथे नेऊन तिच्यावर अत्याचार केला. मागील काही दिवसांपासून त्या महिलेने लग्न करण्याचा तगादा लावल्यानंतर त्याने महिलेस टाळण्यास सुरवात केली तसेच महिलेस जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी त्या महिलेने सेनगाव पोलिस ठाणे गाठून रितसर तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी राजेश वाघमारे उर्फ मोरे याच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे. पोलिस उपाधिक्षक राजकुमार केंद्रे, सहाय्यक पोलिस निरीक्षक दीपक मस्के, उपनिरीक्षक रवीकिरण खंदारे, जमादार सुभाष जाधव यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी आरोपीच्या शोधासाठी पथक रवाना केले आहे. उपनिरीक्षक खंदारे पुढील तपास करीत आहेत.

## तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात उपळी हायस्कूलचा दुसरा क्रमांक



वडवणी। प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील सर्व माध्यमिक व प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा यासाठी वडवणी येथील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मध्ये ५३ वे बाल वैज्ञानिक प्रदर्शन २०२५ २६ भरवण्यात आले होते या विज्ञान प्रदर्शनाचे नियोजन वडवणी तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी आदरणीय बाबासाहेबजी उजगरे, विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कन्या वडवणीचे केंद्रप्रमुख सैलानी शेख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

विज्ञान प्रदर्शनाचे परीक्षक लोकमान्य उच्च माध्यमिक विद्यालयाचे श्री.पाटील सर व श्रीमती शेळके मॅडम या प्रदर्शनामध्ये उपळी हायस्कूल चा संघ सहभागी झाला होता. या संघाने हरित ऊर्जा ग्रीन एनर्जी या विषयावर मॉडेल तयार केले होते यामध्ये सौर ऊर्जेचा वापर करून आपण आपल्या घरातील एसी कुलर फॅन चा वापर ऊर्जा न वापरता कसा करता येईल सौर ऊर्जेच्या आधारे हे दाखवण्यात आले होते या प्रयोगास द्वितीय क्रमांक मिळाला. हा प्रयोग जिल्हा स्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी पात्र झाला आहे.

हा प्रयोग वर्ग नववीतील विद्यार्थी शेख हुजेर हनीफ या विद्यार्थ्याने बनवला त्याबरोबरच प्राथमिक गटातून इचके प्रेमराज बालाजी व कांबळे ज्ञानेश्वर हनुमंत या विद्यार्थ्यांना सुद्धा उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले यास मार्गदर्शन श्री गोरे प्रकाश रामकृष्ण व जाधव वसुवैभव वशिष्ठ या शिक्षकांनी केले. द्वितीय क्रमांक मिळाल्याबद्दल संस्थेचे कोषाध्यक्ष शेख मयूर सर व शाळेचे मुख्याध्यापक भागवतराव बडे सर यांनी विद्यार्थ्यासह मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

## बीडच्या 'सह्याद्री देवराई'ला भीषण आग; अभिनेते सयाजी शिंदे यांनी जोपासलेली हजारो झाडे संकटात

बीड। प्रतिनिधी

बीड शहराच्या जवळ असलेल्या आणि अभिनेता सयाजी शिंदे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या सह्याद्री देवराई प्रकल्पाला आज बुधवारी सायंकाळी ९ वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत डोंगरावरील हजारो छोटी-मोठी झाडे होरपळून निघाली असून निसर्गप्रेमींमधून मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सायंकाळी उशिरा ९ वाजेच्या सुमारास डोंगराच्या एका भागातून आगीच्या ज्वाळा दिसू लागल्या. काही वेळातच या आगीने रौद्र रूप धारण



केले आणि ती संपूर्ण डोंगररांगेत पसरली. आगीची माहिती मिळताच वन विभाग आणि बीड नगरपालिकेच्या अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली. डोंगराळ भाग आणि चढ-उतार असल्याने आग विझवताना जवानांना मोठ्या कसरतीचा सामना करावा लागला.

वन कर्मचारी आणि स्थानिक तरुण आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करत होते.काही वर्षांपूर्वी अभिनेता सयाजी शिंदे यांनी पुढाकार घेऊन बीडच्या या ओसाड डोंगरावर सह्याद्री देवराई हा महत्त्वाकांक्षी वृक्षारोपण प्रकल्प राबवला होता. हजारो वृक्ष लावून त्यांचे संगोपन करण्यात आले होते. बघता बघता या डोंगराचे रूपांतर एका हिरव्यागार वनक्षेत्रात झाले होते. मात्र, आज लागलेल्या या आगीमुळे या श्रमावर पाणी फेरले जाण्याची भीती निर्माण झाली आहे.या आगीत प्रामुख्याने दूर्मिळ देशी वृक्ष, औषधी वनस्पती आणि नव्याने लावलेली रोपे जळून खाक झाली आहेत. तसेच डोंगरावरील जैवविविधतेलाही मोठा फटका बसला आहे. ही आग नैसर्गिक कारणाने लागली की कुणी जाणीवपूर्वक लावली, याचा तपास आता वन विभाग करत आहे. रात्री उशिरापर्यंत आग विझवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू होते.

## अधिवेशनामध्ये आवाज उठवल्यामुळे बंजारा समाजाचा आरक्षणाचा मार्ग मोकळा

### आ. राजेश राठोड यांच्या प्रयत्नांना यश

जालना। प्रतिनिधी

बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात आरक्षण मिळावे, या दीर्घकालीन मागणीसाठी महाराष्ट्र विधान परिषदेचे आमदार राजेश राठोड यांनी विधानमंडळाच्या अधिवेशनात सातत्याने पाठपुरावा केला होता.

त्यांच्या या ठाम भूमिकेची दखल घेत शासनाने संबंधित विषयावर समिती स्थापन केली असून, त्यामुळे बंजारा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला महत्त्वपूर्ण गती मिळाली आहे.

या निर्णयामुळे बंजारा समाजाच्या वतीने आनंद उत्सव साजरा करण्यात आला व समाधानाचे वातावरण असून, आमदार राजेश राठोड यांच्या प्रयत्नांना मिळालेल्या यशाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मंठा तालुक्यातील बंजारा समाज बांधवांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला तालुक्यासह परिसरातील बंजारा समाज बांधवाची मोठ्या संख्येने उपस्थिती होती आ. राजेश राठोड यांच्या या यशस्वी प्रयत्नामुळे बंजारा समाजाच्या सामाजिक न्यायाच्या लढ्याला नवे बळ मिळाले असून, आगामी काळात सकारात्मक निर्णय होण्याची आशा व्यक्त करण्यात येत आहे.

## अजिंठा घाटात पुन्हा वाहतूक कोंडी

### ट्रकमध्ये बिघाड झाल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा



अजिंठा। प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर आणि जळगाव जिल्ह्याला जोडणाऱ्या अजिंठा घाटात आज एका अवजड ट्रकमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. घाटाच्या वळणावरच ट्रक बंद पडल्याने एका बाजूची वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली असून, वाहनांची एक ते दीड किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. यामुळे प्रवाशांचे विशेषतः लहान मुले आणि वृद्ध नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, आज सकाळी एक अवजड ट्रक अजिंठा घाटातील एका तीव्र वळणावर अचानक बंद पडला. घाटातील रस्ता अरुंद असल्याने मागून येणाऱ्या वाहनांना पुढे जाण्यास जागा उरली नाही. अवघ्या काही वेळातच या ठिकाणी शेकडो वाहने अडकून पडली. यामध्ये खाजगी बसेस, दुचाकी, चारचाकी वाहने आणि अत्यावश्यक सेवेतील वाहनांचाही समावेश आहे.

सध्या एका बाजूने हळूहळू वाहतूक सोडण्याचा प्रयत्न केला जात आहे. सध्या नाताळच्या सुट्ट्या आणि पर्यटनाचा हंगाम असल्याने अजिंठा लेणी पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची मोठी गर्दी आहे. मात्र, अजिंठा घाटातील या वाहतूक कोंडीमुळे एसटी महामंडळाच्या बसेसही अडकल्या आहेत. त्यामुळे अनेक प्रवाशांच्या पुढील प्रवासाचे नियोजन कोलमडले असून, त्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

## अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चार गुन्हेगार सहा महिन्यांसाठी हद्दपार

अहिल्यानगर। प्रतिनिधी

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी कोतवाली पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. पोलिसांच्या रेकॉर्डवरील गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये सहभाग असलेल्या चौघांचा समावेश असलेल्या गुन्हेगारी टोळीला सहा महिन्यांच्या कालावधीसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. टोळी प्रमुख सतनामसिंग जितसिंग जुन्नी, टोळी सदस्य सागरसिंग बलबिरसिंग जुन्नी, सोनुसिंग रणजितसिंग जुन्नी व गोपाल राजु नायडु (सर्व रा. संजयनगर, काटवन खंडोबा, अहिल्यानगर) अशी हद्दपार केलेल्या चौघांची नावे आहेत.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कारवाई करण्यात आली. महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ५५ अन्वये हद्दपारीचे आदेश प्राप्त झाल्यानंतर ही कारवाई अमलात आणण्यात आली. सदर इसमांविरोधात रात्रीच्या वेळी घरफोडी, वाहन चोरी, जबरी चोरी यासारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून भारतीय दंड संहिता तसेच भारतीय न्याय संहिता सन २०२३ अंतर्गत एकूण १७ गंभीर प्रकरणांची नोंद आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक काळात संभाव्य अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलिसांनी त्यांच्यावर हद्दपारीची कारवाई केली. पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या आदेशानुसार सदर आरोपींना हद्दपार नोटीसची विधिवत बजावणी करून ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर त्यांना त्यांचे नातेवाईक व मित्रांच्या ताब्यात दौंड (जि. पुणे) येथे दौंड पोलीस ठाणे (पुणे ग्रामीण) हद्दीत सहा महिन्यांसाठी हद्दपार करून सोडून देण्यात आले. ही कारवाई अधीक्षक घार्गे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकरी हक्क मोर्चा धडकला

## मागण्या मान्य न झाल्यास तीव्र बेमुदत आंदोलनाचा इशारा

बीड । प्रतिनिधी

**कापूस, सोयाबीन व तूर या पिकांना योग्य भाव मिळावा या प्रमुख मागणीसाठी शेतकरी हक्क मोर्चाने जिल्हाधिकारी कार्यालयावर जोरदार धडक दिली. शासन व प्रशासनाच्या विरोधात घोषणाबाजी करत शेतकऱ्यांनी हातात कापसाची व तुरीची झाडे घेऊन आपले लक्ष वेधले.**

राज्यातील शेतकरी सध्या अत्यंत बिकट व चिंताजनक परिस्थितीतून जात आहे. शेतीमालाच्या उत्पादन खर्चात प्रचंड वाढ झाली असताना, शेतमालाला मात्र योग्य व न्याय्य भाव मिळत नसल्याने शेतकरी वर्गात तीव्र असंतोष पसरला आहे. विशेषतः कापूस, सोयाबीन व तूर या प्रमुख पिकांमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

या पार्श्वभूमीवर गुरुवार, दि. २५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, बीड येथून जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कृषिमंत्री दत्ता भरणे तसेच प्रशासनाकडे निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात शेतकऱ्यांनी नमूद केले की, सुमारे १४ वर्षांपूर्वीचेच शेतमालाचे दर आजही मिळत आहेत, मात्र खते, बियाणे, मशागत, औषधे, डिझेल, वीज व मजुरीचे दर दुपटीने वाढले आहेत. परिणामी शेतकरी कर्जबाजारी झाला असून शिक्षण,



लग्न व घरखर्चाचा बोजा असह्य झाला आहे. या आर्थिक तणावातूनच शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढत असल्याची गंभीर बाबही मांडण्यात आली. या मोर्चात शेतकऱ्यांनी कापसाला किमान १२ हजार रुपये प्रति क्विंटल दर द्यावा, सोयाबीनसाठी ७ हजार रुपये व तुरीसाठी १२ हजार रुपये प्रति क्विंटल दर निश्चित करावा, CCI कडून होणारी अडवणूक थांबवून सर्व शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करावा, हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी करणाऱ्या बाजार समित्या व व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, बाजारात कमी दराने खरेदी झालेल्या शेतमालाच्या दरातील फरक सरकारने अनुदान स्वरूपात भरून द्यावा, विविध योजना, सबसिडी, अनुदान व पीक विम्याची थकीत रक्कम तात्काळ जमा करावी, मे महिन्यापूर्वी सर्व खरीप व रब्बी पिकांचा हमीभाव जाहीर करावा, महाडीबीटी पोर्टलवरील प्रलंबित अनुदान त्वरित वितरित करावे. आदी मागण्या केल्या.

या मागण्यांकडे शासनाने तात्काळ लक्ष न दिल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी शासनाची राहील, असा इशारा मोर्चाद्वारे देण्यात आला.

या मोर्चात शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, माजी सैनिक अशोक येडे, डॉ. गणेश ढवळे, कुलदीप करपे, सुहास जायभाय, राजू गायके, बाळासाहेब मोरे पाटील, गणेश नाईकवाडे, अर्जुन सोनवणे, कॉम्रेड अजय बुरांडे, अजय राऊत, दिनेश गुळवे, धनंजय मुळे, शेतकरी नेते राजाभाऊ देशमुख,धनंजय मुळे, नयना भाकरे, हिराबाई कांबळे, अंकुश सातपुते, प्रा. ज्ञानेश्वर राऊत ,मोहन गुंड ,नारायण गोले,गणेश मस्के ,संगमेश्वर आंधळकर, भास्कर खंडे, रामधन जमाले,प्रा. शिवराज बांगर ,गणेश बजगुडे, अनिल घुमरे ,सुहास पाटिल, ऍड. मनीषा कुपकर ,दिनकर रिंगणे, विश्वाबर गिरी ,दत्ता प्रभाळे ,खाजाभाई पठाण, राहुल साळुंके ,संतोष शिंदे ,श्रीराम कोरडे ,श्रीकांत गदळे, सुरेश गरड ,अप्पा डाके,आप्पा साहेब महानोर ,हनुमान घोडके यांच्यासह जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील शेतकरी, महिला व युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# मुंबईतील आंदोलनात सहभागी होणार-आ. पंडित

बीड । प्रतिनिधी

धनगर समाजाला अनुसूचित जाती प्रवर्गातील सवलती मिळाव्या यासाठी आंदोलन करणारे धनगर समाजाचे नेते दीपक बोऱ्हाडे यांच्या समवेत कुर्ला ता. बीड येथील धनगर समाज संवाद मेळाव्यात आ. विजयसिंह पंडित सहभागी झाले होते. यावेळी त्यांनी दीपक बोऱ्हाडे यांच्या आंदोलनाला जाहीर पाठिंबा देत २१ जानेवारी रोजी मुंबईमध्ये होणा-या आंदोलनात गेवराई विधानसभा मतदारसंघातील सकल धनगर समाजा समवेत उपस्थित राहून धनगर समाजाच्या



आंदोलनाला पाठिंबा देऊ असे ते यावेळी म्हणाले.

धनगर समाजाचे नेते दीपक बो-हाडे यांच्या समवेत कुर्ला ता. बीड येथील धनगर समाज संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी बोलताना आ. विजयसिंह पंडित पुढे म्हणाले की, धनगर समाजाला आरक्षण मिळावे यासाठी आपण कायम आग्रही असून विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात आपण हा मुद्दा उपस्थित केला होता. जोपर्यंत धनगर समाजाला अनुसूचित जाती प्रवर्गातून आरक्षण मिळत नाही तोपर्यंत आपण शांत बसणार नाही.मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत ज्यावेळी आंदोलन केले त्यावेळी आपण तेथे उपस्थित राहुन मराठा आरक्षणासाठी पाठिंबा दिला होता. त्याच प्रमाणे धनगर समाजालालाही हैद्राबाद गॅझेट नुसार एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत आपण दिपक बो-हाडे यांच्यासोबत राहून ही आरक्षणाची लढाई जिंकू असेही ते यावेळी म्हणाले.

पान ३ वर

# आ.धस यांच्या अभ्यासू विकास कामांची जाण असणाऱ्या नेतृत्वापुढे अधिकारीही झाले थक्क

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आमदार सुरेश धस यांनी मंगळवारी अधिकाऱ्यांची पाटोदा तहसिल कार्यालयात मॅरेथॉन बैठक घेतली या बैठकीत आ.सुरेश धस यांनी विचारलेल्या प्रश्नांमुळे अधिकारीच निरुत्तर झालेच मात्र आ. धस यांचे कॉम्प्युटर माईंड आणि कार्यक्षमता, नागरीकांच्या प्रश्नांची जाण असणाऱ्या आणि प्रश्न सोडविण्याची कार्यपध्दती पाहून या बैठकीतील अधिकारी व कर्मचारीच थक्क झाले.

आ.सुरेश धस यांच्या अभ्यासपूर्ण प्रश्नांच्या सरबत्तीने अधिकारी व कर्मचारी



पुर्ण पणे भांबावलेले दिसले.

पाटोदा तालुक्यातील नागरिकांच्या प्रश्नांवर आता कुठलाही हलगर्जीपणा चालणार नाही असा ठाम इशारा देत आ.धस यांनी आढावा बैठकीत प्रशासनाला अक्षरशः धारेवर धरले.प्रत्येक विभागाच्या कामकाजाचा सखोल अभ्यास करून आकडेवारीनिशी

पान ३ वर

# नवनिर्वाचित नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस युतीच्या वतीने बीड नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. प्रेमलताताई पारवे यांचा आज भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. हा सत्कार जिल्हा शिवसेना, शिवसेना महिला आघाडी तसेच श्रीमंतयोगी चॅरिटेबल ट्रस्ट, बीड संचलित श्रीमंतयोगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, राजीव नगर (नळवंडी नाका, बीड) यांच्या संयुक्त वतीने शिवसेना जिल्हाप्रमुख ड. चंद्रकांत



नवले यांच्या निवासस्थानी पार पडला.

या प्रसंगी सौ. स्मिता चंद्रकांत नवले, राजेश चंद्रकांत नवले, संजय नवले, शिवसेना संघटक स्वप्निल आबूज, युवा सेना लोकसभा प्रमुख शिवराज उगले, मुख्याध्यापक नवनाथ भडके, प्राचार्य मंगेश धुमाळ, अधीक्षक महेश नवले, युवराज जाधव, संदीप परकाळे, रवींद्र गायकवाड, महादेव शेळके, विशाल भोसले, रईस सय्यद, सच्चिदानंद

पान ३ वर

# ससाणे यांच्या उमेदवारीचा नेत्यांनी घेतला धसका

केज । प्रतिनिधी

चिंचोली माळी जिल्हा परिषद गटातून सौ. सरोजनी दादासाहेब ससाणे यांनी आपली उमेदवारी जाहीर केल्यापासून संपूर्ण तालुक्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. त्यांच्या स्पष्ट, ठाम आणि विकासाभिमुख भूमिकेमुळे प्रस्थापित व मोठ्या नेत्यांमध्येही अस्वस्थता दिसून येत असून, ''यावेळी कामाचा उमेदवार निवडून येणार'' अशी चर्चा थेट जनतेतून सुरू झाली.



उमेदवारी जाहीर होताच चिंचोली माळी व परिसरातील गावांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. विविध सामाजिक संघटना, महिला बचत गट, युवक वर्ग तसेच ज्येष्ठ नागरिकांकडून त्यांना मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत आहे. प्रत्यक्ष भेटीगाठी, प्रचार दौरे आणि

पान ३ वर

# भाजपाच्या वतीने इच्छुकांच्या मुलाखतीस उपस्थित रहावे -कचरे,सोळंके, रत्नपारखी

माजलगाव । प्रतिनिधी

आज २६ डिसेंबर शुक्रवार रोजी दुपारी तीन वाजता भारतीय जनता पार्टी माजलगाव संपर्क कार्यालय संभाजी महाराज चौक माजलगाव येथे भारतीय जनता पार्टी माजलगावच्यावतीने जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने इच्छुकांच्या मुलाखती व पदाधिकारी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी बैठक संपन्न होणार आहे तरी भारतीय जनता पार्टीच्या जिल्हा परिषद पंचायत समिती इच्छुक उमेदवार व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन भारतीय जनता पार्टी कीट्टी आडगाव तालुकाध्यक्ष रूपाली कचरे पातरूड मंडळाचे तालुका अध्यक्ष अभिजीत सोळंके माजलगाव शहर मंडळाचे अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले आहे . माजलगाव तालुका भाजपाच्या वतीने होणाऱ्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीस भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख व अक्षय मुंदडा युवा नेते, योगेश क्षीरसागर हे पक्ष निरीक्षक म्हणून उपस्थित राहणार आहेत. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री लोकनेत्या पंकजा मुंडे, मा.खासदार डॉ.प्रीतम मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली या बैठकीचे आयोजन केले आहे.

तरी या बैठकीस माजलगाव तालुक्यातील सर्व भारतीय जनता पार्टीचे ३.जिल्हा परिषद,व ६ पंचायत समितीचे गण मधील प्रवर्ग निहाय सोडतीनुसार विहित नमुना फॉर्म भरून इच्छुक उमेदवार व भाजपाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांनी २६ डिसेंबर शुक्रवार रोजी दुपारी तीन वाजता वेळेवर उपस्थित रहावे असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष रूपाली कचरे डॉक्टर अभिजीत सोळंके विनायक रत्नपारखी यांनी केले आहे.

# राजे धर्माजी गडावरील ५० लाखांच्या विकासकामाचे आ.धस यांच्या हस्ते भूमिपूजन

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील खलाटवाडी येथील ऐतिहासिक राजे धर्माजी गडावर प्रादेशिक पर्यटन विभागाच्या योजनेअंतर्गत ५० लाख रुपयांच्या निधीतून होणाऱ्या विविध विकासकामांचे भूमिपूजन आमदार सुरेश धस यांच्या हस्ते पार पडले.

या निधीतून सिमेंट काँक्रीट रस्ता, भक्तनिवास तसेच इतर आवश्यक मूलभूत सुविधा उभारण्यात येणार आहेत. या विकासकामांमुळे गडावर



येणाऱ्या भाविक व पर्यटकांची सोय होऊन स्थानिक पर्यटनाला चालना मिळेल. त्यामुळे परिसरातील आर्थिक विकासासही बळ मिळेल, असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी यावेळी केले. राजे धर्माजी गडाच्या सर्वांगीण विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

या कार्यक्रमास रामगड येथील ह. भ. प. आंधळे महाराज लिंबोडीकर, सावर्गाव येथील ह. भ. प. अभिमन्यू खाडे महाराज, गडाचे मठाधिपती ह. भ. प. रोहिदास महाराज शास्त्री, माजी आमदार साहेबराव

पान ३ वर

# बोरफडी येथे ‘अनिमिया मुक्त गाव’ उपक्रमाचा शुभारंभ

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मौजे बोरफडी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत अनिमिया मुक्त गाव या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा शुभारंभ गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या उपक्रमाचे आयोजन सरपंच कैलास घुगे यांच्या वतीने करण्यात आले.

यावेळी डॉ. सय्यद यांनी अनिमिया (रक्तक्षय) आजाराबाबत मार्गदर्शन करताना महिलांमध्ये, बालकांमध्ये व किशोरवयीन मुलींमध्ये या आजाराचे प्रमाण वाढत असल्याचे



नमूद केले. योग्य आहार, नियमित हिमोग्लोबिन तपासणी व आयर्नयुक्त औषधोपचार केल्यास अनिमिया प्रभावीपणे नियंत्रणात आणता येतो, असे त्यांनी सांगितले. गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप यांनी आरोग्यदृष्ट्या सक्षम गाव निर्मितीसाठी ग्रामपंचायत, आरोग्य विभाग, आशा स्वयंसेविका व अंगणवाडी सेविका यांनी समन्वयाने काम करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले. सर्व ग्रामस्थांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. सरपंच कैलास घुगे यांनी गावातील सर्व घटकांची तपासणी करून आवश्यक त्या उपचारांसह पोषणविषयक जनजागृती उपक्रम सातत्याने राबवून बोरफडी गाव अनिमियामुक्त करण्याचा संकल्प व्यक्त केला. या शिबिरात गावातील महिलांची व किशोरवयीन मुलींची आरोग्य तपासणी व हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली व औषध उपचार केले. कार्यक्रमास विस्तार अधिकारी पारटकर सर , चांगन सर ,युवा उद्योजक सुनील कुटे, ग्रामपंचायत सदस्य, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका , ग्रामपंचायत अधिकारी गिते तसेच शालेय विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हजयात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांसाठी एक महिन्याची कार्यशाळा, मार्गदर्शन शिबिर

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा खादीम-उल-हुज्जाज कमिटी तर्फे हज यात्रा २०२६ साठी जाणाऱ्या बीड शहरांच्या यात्रियानं साठी एक महिन्याची कार्य शाळा, मार्गदर्शन शिबिर आयोजित केलेली आहे. हे कार्ये शाळा २ जनवरी २०२६ रोजी मदीना मस्जिद, मोमिन पुरा, बीड येथील दर रोज रात्री ९ वाजता सुरू होणार आहे. मदीना मस्जिद , मोमिन पुरा बीड येथील होणारी कार्येशाळा फक्त पुरुषांसाठी आयोजित केलेली आहे .हज २०२६ साठी जाणाऱ्या बीड शहरातील सर्व पुरुषांनी जास्त जास्त लाभ घ्यावा.



महिलांसाठी हे कार्यशाळा, मार्गदर्शन शिबिर १० जनवरी २०२६ रोजी मदरसा-तुल-मोमीनात, बलभीम चौक, बीड येथील दुपारी २:३० वाजता सुरू होणार आहे. हज २०२६ साठी जाणाऱ्या बीड शहरातील सर्व महिलांनी जास्त जास्त लाभ घ्यावा.

मुस्लिम धर्मा मध्ये श्रीमंत असलेल्या मुस्लिम बांधव आणि बहिणी वर आयुष्यात एकदा हज फर्ज केलेला आहे. फर्ज हज अदा करण्यासाठी मुस्लिम बांधवना इंडिया ते सऊदी अरेबिया मक्का मध्ये जावे लागतात . पूर्ण जगातील सर्वात पवित्र जागा मक्का आणि मदीना आहे. हाजी मक्का मध्ये जाऊन आपला फर्ज हज अदा करतात.मार्गदर्शन शिबिर, कार्य शाळा मध्ये हज यात्रा मध्ये उमराह , हज, मक्का मदिना येथील जे जे आमाल, कार्य करावा लागतात ते सर्व आमाल सविस्तर ज्येष्ठ

पान ३ वर

# गंडाळवाडी येथे लग्नाच्या नावाखाली तरुणाची ६ लाख रुपयांना फसवणूक

पाटोदा । प्रतिनिधी

चार लाख देत पंढरपूरमध्ये लग्न केले पण पाचव्याच दिवशी नवरी पसार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी अंमळनेर पोलीस ठाण्यात नवरीसह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.


गंडाळवाडी येथील ३४ वर्षीय संजय शामराव पवार हे गेल्या काही काळापासून विवाहासाठी मुलीच्या शोधात होते. हीच संधी साधून मध्यस्थ दत्ता पवार (रा. सुपा) आणि पठाण (रा. चोभा निमगाव) यांनी संजय यांना एका मुलीचे स्थळ सुचवले. लग्नाच्या बोलणीसाठी पंढरपूर येथे मुलगी पाहण्याचा कार्यक्रम ठरला. यावेळी मुलीची कथित मावशी जयश्री शिंदे आणि एका महिला एजंटने लग्नासाठी ४ लाख रुपयांची रोकड मागितली. लग्नाच्या आशेपोटी संजय यांनी ही रक्कम दिली आणि त्यांच्या सांगण्यावरून सुमारे २ लाख रुपयांचे सोन्याचे दागिनेही खरेदी केले.

पाचव्या दिवशी नवरी पसार

पंढरपूर येथे नोटरी पद्धतीने आणि त्यानंतर गावी धार्मिक विधी करून संजय यांचा विवाह रुपाली बाळू दिशागंज (रा. लाडगाव, वैजापूर) हिच्याशी पार पडला. लग्नानंतर पाच दिवस रुपाली सासरी व्यवस्थित राहिली. मात्र, १५ डिसेंबरच्या रात्री घरातील सर्वांची नजर चुकून ती ४ लाखांची रोकड आणि २ लाखांचे दागिने घेऊन पसार झाली.

नवरी बेपत्ता झाल्याचे लक्षात येताच संजय यांनी मध्यस्थांशी संपर्क साधला. मात्र, मध्यस्थांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. कहर म्हणजे, मुलीची मावशी जयश्री शिंदे आणि एजंट महिलेने संजय यांनाच धमकावले. मुलगी आता परत येणार नाही, पुन्हा फोन केला तर तुझ्यावर आणि तुझ्या मित्रांवर बलात्काराचा खोटा गुन्हा

पान ३ वर




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# महापालिका निवडणूकीत ब्राह्मण समाजाचा प्राधान्याने विचार व्हावा-सकल ब्राह्मण समाज समितीची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरात ब्राह्मण मतदारांची संख्या सुमारे १६ ते १८ टक्के एवढी असताना राजकीय पक्षांकडून नेहमीच ब्राह्मण उमेदवारांना डावलले जात असल्याची भावना आहे. त्यामुळे येत्या पुणे महापालिका निवडणुकीमध्ये ब्राह्मण समाजाला योग्य आणि पुरेसे प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी सर्वच राजकीय पक्षांना सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने आज आवाहन करण्यात आले.




या वेळी समन्वयक भालचंद्र कुलकर्णी, सह-समन्वयक ड. ईशानी जोशी, प्रवक्ते विश्वजीत देशपांडे, राजकीय समितीचे सदस्य विश्वनाथ भालेराव, मंदार रेडे, मकरंद माणकीकर आदी पदाधिकारी उपस्थित होते. सकल ब्राह्मण समाज समितीमध्ये पुण्यातील आम्ही सारे ब्राह्मण, परशुराम हिंदू सेवा संघ, ब्राह्मण जागृती सेवा संघ, अ. भा. ब्राह्मण महासंघ, महाराष्ट्र चित्पावन संघ, चित्पावन अस्तित्व संस्था, देशस्थ ऋग्वेदी शिक्षणोत्तेजक संस्था, याज्ञवल्क्य आश्रम, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, महाराष्ट्र ब्राह्मण सभा, कृष्ण यजुर्वेदी तैतरीय संघ, शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन मध्यवर्ती ब्राह्मण मंडळ, पुणे, अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था (नाशिक), पुणे केंद्र, विप्र फाउंडेशन, सर्वशाखीय ब्राह्मण महासंघ, पौरोहित्य पुरोहित फाउंडेशन, गौड सारस्वत ब्राह्मण संघ अशा सुमारे ३० ब्राह्मण संस्था, संघटना सदस्य आहेत.नुकत्याच झालेल्या नगरपालिका, नगरपंचायतीमध्ये देखील ब्राह्मण समाजातील सुमारे ५० कार्यकर्ते निवडून आले आहेत. एकट्या मराठवाड्यात पाच ठिकाणी ब्राह्मण नगराध्यक्ष निवडून आले आहेत.कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रातूनही मोठ्या संख्येने ब्राह्मण उमेदवार निवडून आले आहेत. पुण्यात ४१ प्रभागांपैकी सुमारे १२ ते १३ प्रभाग ब्राह्मण बहुल आहेत. या प्रभागात ब्राह्मण उमेदवारांचा विचार व्हावा, असे सर्वच राजकीय पक्षांना आवाहन केले आहे. याबरोबरच सर्वसाधारण गटांमधून केवळ खुल्या प्रवर्गातीलच उमेदवारांना प्राधान्य देण्यात द्यावे. त्यामध्ये आरक्षित समाजातील उमेदवारांना तिकीट देऊ नये, अशी मागणी आम्ही सर्वच पक्षांच्या प्रमुखांना केली असून, विविध पक्षांतील ३० उमेदवारांची यादीही दिल्याचे या सदस्यांनी सांगितले.

# दोनदा दुरुस्ती करूनदेखील रस्ता उखडला; नागरिकांनी व्यक्त केला तीव्र संताप



***शिरूर । प्रतिनिधी***

शिरूर तालुक्यातील शिरूर-मलठण रस्त्यावरील कोंढण ओढा परिसरात सार्वजनिक बांधकाम विभागाने दोन वेळा खड्डे भरून दुरुस्ती केल्यानंतरही काही दिवसांतच तोच रस्ता पुन्हा उखडल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. लाखो रुपये खर्च करून करण्यात आलेली ही दुरुस्ती दर्जाहीन असल्याचा आरोप होत असून, संबंधित विभागाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

या रस्त्यावरून दररोज शेकडो वाहनांची वर्दळ असते. शाळकरी विद्यार्थी, कामगार, शेतकरी तसेच रुग्णवाहिका यांनाही याच मार्गाचा वापर करावा लागतो. मात्र रस्त्यावर पुन्हा मोठे खड्डे पडून खडी वर आल्याने खडीवरून दूचाकी वाहन घसरून अपघात होत आहे. तसेच फोर व्हीलर गाड्यांचे टायर या ठिकाणी फुटत आहे. अपघाताचा धोका वाढला असून दुचाकीस्वार आणि लहान वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

स्थानिक नागरिक नितीन थोरात यांनी सांगितले की, एकदा नाही तर दोनदा खड्डे भरले, पण निकृष्ट साहित्य वापरल्यामुळे रस्ता उखडला. सार्वजनिक बांधकाम विभाग जाणीवपूर्वक याकडे काना डोळा करत आहे. त्यामुळे ही दुरुस्ती केवळ कागदावरच झाली की काय, असा संशय नागरिकांकडून व्यक्त होत आहे. दरम्यान, या प्रकरणी संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करून, शिरूर येथे कामावर असणाऱ्या परंतु पुणे येथे राहणाऱ्या आधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थ, वाहनचालक आणि प्रवासी संघटनांकडून होत आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# आंबेडकर स्मारक विस्तारासाठी एमएसआरडीसी मंगळवार पेठेतील जागा ताब्यात घेणार

**पुणे । प्रतिनिधी**

शहरामधील मंगळवार पेठ भागातील सुमारे ८ हजार ९०० चौरस मीटर जागा महाराष्ट्र राज्य रस्तेविकास महामंडळाने (एमएसआरडीसी) पुन्हा ताब्यात घेण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत एमएसआरडीसीकडून खासगी विकासकाला जमीन सोडण्याबाबत पत्रव्यवहार केला आहे. ही जमीन डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या विस्तारीकरणासाठी आवश्यक असल्याने सार्वजनिक हिताच्या दृष्टीने ही जमीन परत घेण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या निर्णयामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या विस्तारीकरणाचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता असून, हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जात आहे.



एमएसआरडीसी आणि एनजी वेंचर्स यांच्यात ४ सप्टेंबर २०२४ रोजी जमिनीचा भाडेपट्टा करार करण्यात आला होता. मात्र, ही जमीन डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या विस्तारीकरणासाठी प्रस्तावित आहे. या मागणीसाठी विविध आंबेडकरवादी संघटनांनी सातत्याने पाठपुरावा व आंदोलने केली होती. या आंदोलनांची दखल घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार तसेच विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोर्हे यांच्या मध्यस्थीने संघटनांचे पदाधिकारी, नगरविकास विभाग, परिवहन विभाग, महसूल विभाग यांच्यात वेळोवेळी बैठका घेऊन समन्वय साधण्यात आला. त्यानंतर महामंडळाने एनजी वेंचर्स यांना पाठविलेल्या पत्रानुसार १५ दिवसांच्या आत एक पर्याय निवडण्यास सांगण्यात आले. पहिल्या पर्यायानुसार, कंपनीने भरलेले प्रीमियम, भाडे तसेच अनामत रक्कम एमएसआरडीसीकडून परत करण्यात येणार आहे, तर दुसर्या पर्यायानुसार, एमएसआरडीसीच्या ताब्यात असलेली अन्य कोणतीही पर्यायी जमीन वाटप करण्याचा पर्याय देण्यात आला आहे. दरम्यान, वारंवार करण्यात येत असलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले असून, संबंधित खासगी संस्थेकडून सार्वजनिक हिताच्या दृष्टीने सकारात्मक प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा गोर्हे यांनी व्यक्त केली.

# शिवसेनेकडून ४० स्टार प्रचारकांची यादी प्रसिध्द; पुण्यातून डॉ. नीलम गोऱ्हे आणि श्रीरंग बारणे यांचा समावेश

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात महानगरपालिका निवडणुकांचे बिगुल वाजले असून, प्रचाराचे नारळ फुटू लागले आहे. त्या पार्श्वभूमीवर शिवसेनेकडून या निवडणुकांसाठी ४० स्टार प्रचारकांची यादी प्रसिध्द केली आहे. त्यामध्ये पुणे जिल्ह्यातून शिवसेना नेत्या व विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे आणि उपनेते व खासदार श्रीरंग बारणे यांची स्टार प्रचारक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या आशिर्वादाने तसेच शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार या ४० स्टार प्रचारकांची याची शिवसेना सचिव संजय मोरे यांनी प्रसिध्द केली आहे. त्यामध्ये एकनाथ शिंदे यांच्यासह नेते रामदास कदम, गजानन किर्तीकर, आनंदराव आडसूळ, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, नेत्या डॉ. निलम गोऱ्हे, मिना कांबळे यासह नेते, उपनेते, मंत्री, खासदार, आमदार आणि प्रवक्ते असे ४० जणांचा समावेश आहे. यामध्ये पुणे जिल्ह्यातून डॉ. गोऱ्हे आणि बारणे यांची स्टार प्रचार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# निवडणुकीसाठी दोन्ही राष्ट्रवादीमधील जागा वाटपाचा तिढा सुटेना; रविवारी घोषणा होण्याची शक्यता

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्यात जागा वाटपाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. शुक्रवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची बैठक होणार आहे. त्यामध्ये जागा वाटपावर अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे दोन्ही पक्ष निवडणुकीसाठी एकत्र येण्यासंदर्भातील घोषणा शुक्रवारी होण्याऐवजी आता रविवारी होण्याची शक्यता आहे.



महाविकास आघाडीमधील प्रमुख घटक पक्ष असलेला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व महायुतीमधील प्रमुख घटक पक्ष असलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, या दोन्ही पक्षांनी महापालिका निवडणूक एकत्र लढण्याबाबत चर्चा सुरू केली होती. दोन्ही पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये मागील काही दिवसांपासून निवडणूक एकत्र लढण्यावरून बैठका सुरू होत्या. विशेषतः मागील आठवडाभरामध्ये दोन्ही पक्षांच्या प्रमुख नेत्यांकडून निवडणुकीतील जागांच्या वाटाघाटींबाबत चर्चा सुरू होती. उपमुख्यमंत्री अजित पवार व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांनीही एकत्र लढण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला होता. दरम्यान, दोन्ही पक्षांमधील जागा वाटपाचा तिढा अद्यापही सुटलेला नाही. विशेषतः काँग्रेस पक्ष स्वबळावर जाण्याच्या मार्गावर असल्याने जागा वाटपाचे गणित बिघडले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला जागा वाटपाचे गणित पुन्हा एकदा जुळवावे लागणार आहे. गुरुवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पक्षाच्या शिवाजीनगर येथील कार्यालयात उपस्थिती लावली. त्यांच्या उपस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी गटनेते अशोक हरणावळ यांनी पक्ष प्रवेश केला. त्यानंतर पवार यांनी जिल्ह्यासह राज्याच्या वेगवेगळ्या भागातून नगरपंचायत व नगरपरिषदेत निवडून आलेल्या उमेदवारांची भेट घेतली. यावेळी पक्षाचे शहराध्यक्ष सुभाष जगताप, सुनिल टिंगरे, कार्याध्यक्ष रूपाली ठोंबरे आदी उपस्थित होते. मात्र त्यावेळी पुण्यातील जागा वाटपाबाबत चर्चा झाली नसल्याचे पक्षाच्या नेत्यांनी सांगितले.

# आरबीआयच्या सुधारीत धोरणांसाठी पुणे जिल्हा बँकेचा पुढाकार

**पुणे । प्रतिनिधी**

सहकाराअंतर्गत सहकार या उक्तीप्रमाणे पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक प्रथमपासूनच काम करीत असून, हे सहकार चळवळ वाढीसाठी एक बळकट पाऊल असल्याचे गौरवोद्गागार पुणे जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे यांनी काढले. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने जारी केलेली सुधारीत धोरणे, बँकांची प्रचलित धोरणांसोबत त्यांचा तुलनात्मक अभ्यास करून सुधारीत धोरणे, कार्यपद्धती व अंमलबजावणीबाबतचा कृती आराखडा तयार करण्याकरिता पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्यालयात बुधवारी ( दि. २४) महत्त्वपूर्ण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे उद्घाटन बँकेचे उपाध्यक्ष सुनील चांदेरे व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे उपस्थित मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर मार्गदर्शन करतांना डॉ. दुर्गाडे बोलत होते.

या कार्यशाळेस सनदी लेखापाल उदय कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.




कार्यशाळेमध्ये अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत वैद्य, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत पटारे, सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद गावडे, परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व्यंकटेश कुरूंदकर व सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सरव्यवस्थापक राजेंद्र गाढवे व राज्य सहकारी बँक व महाराष्ट्र राज्यातील १५ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या कार्यशाळेचे प्रस्तविक पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिरूध्द देसाई तर सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन सरव्यवस्थापक संजय शितोळे यांनी केले. 'भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) ज्या सर्वसमावेशक सूचना नव्याने जारी केलेल्या आहेत. त्याचे अनुपालन सर्व क्षेत्रीय स्तरावरील जिल्हा बँकांमध्ये व्हावे, यासाठी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक पुढाकार घेऊन काम करणार आहे. सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी एकत्र येवून कामकाज करण्याची गरज असल्याची अपेक्षाही प्रा. दुर्गाडे यांनी व्यक्त केली.

# बारामतीत रविवारी देशातील अत्याधुनिक एआय सेंटरचे होणार उद्घाटन

**बारामती । प्रतिनिधी**

देशातील सर्वात अत्याधुनिक व ग्रामीण जीवनाचा चेहरामोहरा बदलणा-या विद्या प्रतिष्ठान शरदचंद्र पवार सेंटर ऑफ एक्सलेन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजेन्सचे उद्घाटन रविवारी (ता. २८) होत आहे.



अदानी उद्योगसमूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांच्या हस्ते, ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे, खासदार सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत सकाळी दहा वाजता गदिमा सभागृहात हे उदघाटन होणार आहे. संस्थेचे उपाध्यक्ष अँड. ए. व्ही. प्रभुणे, सचिव अँड. नीलीमा गुजर व खजिनदार युगेंद्र पवार यांनी या बाबत माहिती दिली. बदलत्या काळाची पावले ओळखत आर्टिफिशियल इंटेलिजेन्सचे शिक्षण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावे या उद्देशाने ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या पुढाकारातून बारामतीत हे केंद्र सुरु होत आहे.

एआय क्षेत्रातील महत्त्वपूर्ण पाऊल

शरदचंद्र पवार सेंटर ऑफ एक्सलन्स (-ख) हे केंद्र कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, डेटा सायन्स, व्यवसाय विश्लेषण (ईीळ-पर्शीी -परश्रींळली) व नवोन्मेष (खपर्पोरींळेप) या आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रात विद्यार्थ्यांना, संशोधकांना व उद्योगजगताला एकत्र आणणारे महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे.

# पुण्यात एकहाती सत्ता राखण्यासाठी भाजपची खेळी; उमेदवारी वाटपाचा फॉर्म्युला ठरला, जुन्यांना पुन्हा संधी

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिकेत एकहाती सत्ता कशी मिळेल, यासाठी भाजपने चाचपणी सुरू केल्याची चर्चा आहे. पुणे (झींपश) महापालिकेसाठी उमेदवारी कोणाला द्यायची याबाबत निर्णय घेण्यासाठी बुधवारी पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक एका हॉटेलमध्ये झाली. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, पक्षाचे पुणे शहर अध्यक्ष धीरज घाटे, महापालिका निवडणूक (एश्रशलींळेप) प्रमुख गणेश बीडकर, राजेश पांडे, माजी सभागृह नेते श्रीनाथ भिमाले यांच्या उपस्थितीत ही बैठक झाली असून भाजपची यादी निश्चित झाल्याचे समजते. भाजपकडून १०० हून अधिक जुन्याच नगरसेवकांना संधी दिली जात असून ही यादी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे लवकरच पोहोचणार आहे.



सन२०१७ मधील नगरसेवकांना भाजप पुन्हा संधी देणार आहे. त्यानुसार, भाजपकडून १०० उमेदवारांची यादी फायनल झाली असून त्यात माजी नगरसेवकांची नावंही फायनल झाल्याची माहिती आहे. पुण्यातील सगळ्या विधानसभा मतदारसंघातील आढावा घेऊन जुन्या नगरसेवकांना संधी देण्याचं भाजपच्या कोअर कमिटीच्या बैठकीत निश्चित करण्यात आलं आहे. भाजपचे २०१७ मध्ये ९९ उमेदवार निवडून आले होते, तर एकाने त्यांना पाठिंबा दिला होता. त्यानंतर विधानसभेच्या निवडणुकांवेळी ठाकरे गटातील ५ नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यामुळे, या सर्व नगरसेवकांसह १२५ जागा निवडून आणण्याचा भाजपचा दावा आहे. पुण्यातील भाजप आमदार आणि स्थानिक नेते देवेंद्र फडणवीसांकडे त्यांची यादी सादर करणार आहेत. त्यामुळे, भाजपच्या या यादीत किती आणि कोणत्या नवीन उमेदवारांना संधी मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आरपीआयची महिला नेता असल्याची धमकी देऊन २ गुंठे जमीन हडपण्याचा प्रयत्न; तिघांवर गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

आरपीआयची महिला नेता असल्याची धमकी देऊन एका व्यवसायिकाच्या २ गुंठे जमिनीवर ताबा टाकून ती हडपण्याचा प्रयत्न करण्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटना हवेली तालुक्यातील लोणी काळभोर ग्रामपंचायत हद्दीतील गट क्रमांक १६९३ मध्ये बुधवार (२४ डिसेंबर) रोजी दुपारी घडली आहे. पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार याप्रकरणी हजीलाल शब्बीर शेख (वय-४५, रा. मंत्री मार्केट, हडपसर, पुणे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रुपाली महादेव काळभोर, अशोक आणाराव सुर्यवंशी व प्रितम सावंत (सर्व राहणार, लोणी काळभोर, ता. हवेली, जि. पुणे) यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सन २०१९ मध्ये हजीलाल शेख व त्यांच्या सहकाऱ्यांनी भाऊसाहेब फुले यांच्याकडून जमीन खरेदी केलेली आहे. या जमीनीची 'क' प्रत तयार करुन सदर जमीनीला सिमेंटचे कंम्पाऊन्ड केले आहे. ही जमीन गेल्या सात वर्षापासून शेख यांच्या ताब्यात आहे. बुधवारी दुपारी पावणे तीन वाजण्याच्या सुमारास रुपाली काळभोर, अशोक सुर्यवंशी व प्रितम सावंत हे हजीलाल शेख यांच्या जमिनीजवळ आले आणि शिवीगाळ करुन ही गायरान जमीन आहे. तुम्ही परत येथे पाय ठेवायचा नाही. तुम्ही पुन्हा जर या ठिकाणी आलात तर मी तुमच्या विरुध्द खोटा गुन्हा दाखल करेल व तुम्हाला आडकवेल. मी आरपीआयची मोठी नेता आहे, असे म्हणुन धमकी दिली. तसेच शेख यांच्या जमिनीवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला आहे. याप्रकरणी हजीलाल शेख यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार वरील तिघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पूजा माळी करत आहेत.

# उत्तमनगर, वारजे माळवाडीतील घरफोड्यांचा पर्दाफाश; दीड कोटींचा मुद्देमाल जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

उत्तमनगर आणि वारजे माळवाडी परिसरात झालेल्या दोन घरफोड्यांच्या गुन्ह्यांतील चार आरोपींना वारजे माळवाडी पोलिसांनी शिताफीने अटक केली. पोलिसांनी आरोपींकडून एकूण ७७४ ग्रॅम सोन्याच्या दागिने आणि १९ लाखांची रोकड असा सुमारे दीड कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



वरिष्ठ पोलिस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, चोरट्यांनी एका बंद सदनिकेतून ५८० ग्रॅम सोन्याचे दागिने आणि साडेचार लाख रुपयांची रोकड चोरी केली होती. परिमंडळ तीनचे पोलिस उपायुक्त संभाजी कदम यांनी उत्तमनगर पोलिस ठाण्यात दाखल या गुन्ह्याची दखल घेत वारजे माळवाडी पोलिसांना तपासाच्या सूचना दिल्या. सहाय्यक आयुक्त डॉ. शीतल जानवे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक संजय नरळे यांच्या तपास पथकाने परिसरातील शेकडो सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले.

तपासादरम्यान आरोपी अरविंद प्रल्हादसिंग राजपुरोहित (वय २९, रा. म्हाळुंगे) याचा सहभाग उघडकीस आला. तो फिर्यादीचा नातेवाईक असल्याचे समोर येताच त्याच्याकडे चौकशी केली. त्याच्याकडून सुमारे एक कोटी रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि रोकड जप्त केली. पुढील तपासासाठी त्याला उत्तमनगर पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.